नोव्हेंबर / November
सोमवार / Monday
दि.०९ / Dt: 09
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ८ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक २१/Issue 21 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

दिपावली व पाडवा

निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा...

आनंदाचे दीप उजळू दे,
दुःखाचा अंधार दूर होऊ दे,
नव्या आशा, नवी स्वप्ने आणि
नवी उमेद घेऊन आपल्या आयुष्यात
सुख-समृद्धीची बरसात होऊ दे!

भास्कर (आबा) दानवे
जिल्हाध्यक्ष, भाजपा जालना- महानगर

दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
दै. जगमित्र परिवार

iconsteel.com
30+ A LEGACY OF YEARS SINCE 1991
आयकॉन स्टील
टीएमटी बार
इंडिया का आयकॉन
डक्टिलिटी आणि मजबूतीचा सर्वश्रेष्ठ समतोल

ग्रामपंचायत कार्यालय, नेर ता. जि. जालना

दीपावली, पाडवा व भाऊबीज निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा



तेजस कुलवंत
सरपंच

-: शुभेच्छुक :-
उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी व सर्व कर्मचारी ग्रामपंचायत कार्यालय नेर ता. जि. जालना

शिवसेना
सोनपावलांनी येवो आनंद, सुख-समृद्धीचा होवो वर्षाव..
दिवाळी घेऊन येवो, आयुष्यात नव्या स्वप्नांचा ठेवा..!
आपल्या जीवनात नांदो सुख, शांती आणि भरभराट..
शुभ दिपावली
दिपावली पाडवा
निमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
मा.श्री. अर्जुनराव खोतकर
आमदार जालना विधानसभा
माजी मंत्री तथा शिवसेना उपनेते
अभिमन्यू अर्जुनराव खोतकर
सचिव, युवासेना, महाराष्ट्र राज्य.

दिपावली व पाडवा
निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
संदिप क्षीरसागर
आमदार, बीड विधानसभा मतदार संघ

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.०९ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे विभागाची धानोर येथे कारवाई; ३०३ किलो बर्फीचा साठा नष्ट

आळंदी । प्रतिनिधी
अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे विभागाने 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने २ नोव्हेंबर २०२६ रोजी आळंदी-मार्कळ रोडवरील धानोर येथील माऊली कॉम्प्लेक्समधील मे.आर. बिकानेर मिठाई या विक्री केंद्राची तपासणी केली. यावेळी दुकानात ३०३ किलो बर्फीचा साठा आढळून आला. तसेच कलाकंद हा मिठाईचा पदार्थही आढळला. तपासणीदरम्यान बर्फीचा साठा संशयित निकृष्ट दर्जाचा असल्याचे, तो खोलीच्या तापमानावर साठवून ठेवल्याचे, तसेच त्यावर आवश्यक लेबलिंग नसल्याचे निदर्शनास आले. याशिवाय मिठाईच्या खरेदीची बिलेही उपलब्ध नव्हती. बर्फी हा नाशवंत पदार्थ असल्याने प्रशासनाने संपूर्ण ३०३ किलो साठा जागेवरच नष्ट केला. तर कलाकंदचा नमुना तपासणी व विश्लेषणासाठी घेण्यात आला आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी ऋ.र. मरेवार यांनी केली. क्षेत्रीय सहाय्यक आयुक्त एस. एन. चट्टे आणी सह आयुक्त (अन्न) एस. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

स्वच्छतेच्या राष्ट्रीय क्षितिजावर पिंपरी चिंचवडची गौरवशाली भरारी

नावीन्यपूर्ण उपक्रम, प्रशासकीय समन्वय आणि लोकसहभागातून शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला नवी दिशा

पिंपरी । प्रतिनिधी
स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी शहराच्या निर्मितीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या सातत्यपूर्ण स्वच्छता उपक्रमांची आणि प्रभावी स्वच्छता व्यवस्थापनाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील महानगरपालिकेच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे शहराच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. प्रशासकीय नियोजन, विविध विभागांमधील समन्वय, स्वच्छता सेवकांचे अथक परिश्रम आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नागरिकांचा सक्रिय सहभाग या सामूहिक प्रयत्नांच्या बळावर शहराने स्वच्छतेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.
महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात स्वच्छतेविषयक विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. कचरा विलगीकरण, ओला व सुका कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, जनजागृती मोहिमा, पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरणाला प्रोत्साहन देणारी आर.आर.आर. केंद्रे तसेच पर्यावरणपूरक संकल्पनांच्या माध्यमातून शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात आहे.
केवळ स्वच्छता मोहीम राबविण्यापुरते मर्यादित न राहता नागरिकांच्या दैनंदिन सवयींमध्ये स्वच्छतेविषयीची जाणीव निर्माण करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी लोकसहभाग वाढविणे आणि स्वच्छतेला सामूहिक जबाबदारीचे स्वरूप देणे, या उद्देशाने आरोग्य विभागाकडून विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. यामध्ये स्वच्छता सेवक, स्वयंसेवी संस्था, गृहनिर्माण संस्था आणि नागरिकांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरत आहे.



महापालिकेच्या विविध विभागांचा समन्वय ठरतोय यशाचा आधार

शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला सक्षम आणि परिणामकारक स्वरूप देण्यात महापालिकेच्या विविध विभागांचे योगदानही तितकेच मोलाचे आहे. आरोग्य विभागासोबतच जलनिस्सारण, पाणीपुरवठा, स्थापत्य, विद्युत, पर्यावरण आणि उद्यान विभागांनी परस्पर समन्वयातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सार्वजनिक सुविधांची देखभाल आणि शहराच्या पायाभूत व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. विविध विभागांनी आपापल्या कार्यक्षेत्रात केलेल्या नियोजनबद्ध कामामुळे स्वच्छता व्यवस्थेला अधिक व्यापक आणि परिणामकारक स्वरूप प्राप्त झाले आहे.
यासोबतच सहायक आरोग्य अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक आणि सफाई सेवक यांनी क्षेत्रीय स्तरावर केलेले नियोजन, नियमित देखरेख आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतील योगदान या यशाचा महत्त्वाचा आधार ठरले आहे. शहराच्या कानाकोपऱ्यात स्वच्छता राखण्यासाठी प्रत्यक्ष मैदानावर कार्यरत असलेल्या सफाई सेवकांचे परिश्रम विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण कामामुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम होत आहे.

नागरिकांचा सहभाग हीच स्वच्छतेच्या यशाची खरी ताकद

महापालिकेच्या प्रयत्नांना नागरिकांच्या सक्रिय सहभागाची जोड मिळाल्याने स्वच्छता अभियानाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. कचऱ्याचे योग्य विलगीकरण, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, पुनर्वापराला प्रोत्साहन देणे, पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सहभागी होणे आणि स्वच्छतेविषयी इतरांमध्ये जागरूकता निर्माण करणे, अशा विविध माध्यमांतून नागरिक आपले योगदान देत आहेत. प्रशासनाचे नियोजन, विविध विभागांमधील समन्वय, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे परिश्रम आणि नागरिकांची स्वच्छतेप्रती असलेली जबाबदारीची भावना या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक बळ मिळत आहे.
महापौर रवि लांडगे म्हणाले, स्वच्छ आणि सुंदर शहर ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पिंपरी चिंचवड शहराला राष्ट्रीय स्तरावर मिळणारा गौरव हा शहरातील नागरिक, स्वच्छता सेवक आणि महापालिकेतील सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांचा सन्मान आहे. यापुढेही शहराच्या स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि नागरिकांना अधिक आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध राहील.
आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, स्वच्छ सर्वेक्षणातील पिंपरी चिंचवड महापालिकेची कामगिरी ही नियोजनबद्ध कार्यपद्धती, प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सक्रिय लोकसहभागाची पावती आहे. शहरातील स्वच्छता व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि सातत्यपूर्ण जनजागृतीवर प्रशासनाचा विशेष भर आहे. विविध विभागांचा समन्वय आणि नागरिकांचा सहभाग ही या यशाची प्रमुख ताकद आहे. राष्ट्रीय स्तरावरील हा गौरव अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देणारा असून, पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छतेच्या क्षेत्रात अग्रस्थानी नेण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.
अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, स्वच्छ सर्वेक्षणातील यश ही महापालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने केलेल्या नियोजनबद्ध कामाची फलश्रुती आहे. स्वच्छता व्यवस्थेचे बळकटीकरण, कचरा व्यवस्थापनातील सुधारणा, नावीन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी आणि जनजागृती यावर प्रशासनाने सातत्याने भर दिला आहे. स्वच्छतेच्या प्रत्येक उपक्रमात नागरिकांचा सहभाग वाढविणे आणि विविध विभागांच्या माध्यमातून स्वच्छतेचे उद्दिष्ट प्रभावीपणे साध्य करणे, यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. राष्ट्रीय स्तरावर मिळालेला हा गौरव भविष्यात अधिक गुणवत्तापूर्ण काम करण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व रणजीत काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त

मावळात आदिवासी बांधवांसाठी दिवाळी साहित्य वाटप व मोफत आरोग्य शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न

तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी
केंद्रीय राज्यमंत्री सहकार व नागरी हवाई उड्डाण, खासदार पुणे लोकसभा, अध्यक्ष महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन मुरलीधरजी मोहोळ आणि आमचे सहकारी मित्र, भाजपाचे युवा नेतृत्व रणजीत काकडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, मावळ तालुक्यातील आदिवासी बांधवांसाठी एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला. १०० आदिवासी कुटुंबांना दिवाळी साहित्य वाटप करण्यात आले. दिवाळीचा आनंद प्रत्येक घरात पोहोचविण्यात आला. मोफत सर्वरोग आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर संपन्न झाले. रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ सकाळी १०.०० वाजता ठाकर वस्ती, गणपती माळ, सोमाटणे फाट्याजवळ, जुना मुंबई-पुणे हायवे, तळेगाव रोड, ता. मावळ या ठिकाणी आरोग्य शिबीर व दिवाळी किट वाटप



करण्यात आला.
या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून शांताराम बापू कदम माजी सभापती, मावळ तालुका, सचिन घोटकुले माजी जिल्हा परिषद सदस्य, राजेश मुऱ्हे संघटक मंत्री, भारतीय जनता पार्टी, रणजीत दादा काकडे सत्कारमूर्ती व युवा नेते, भाजपा, श्रीकृष्ण भेगडे युवा नेते, भाजपा, सुभाष धामणकर किसान मोर्चा अध्यक्ष, बाबू कोळी सरचिटणीस, तात्या पाचपिंड सरचिटणीस, अनिरुद्ध काळोखे युवा मोर्चा अध्यक्ष, अजित शेलार भारतीय कामगार मोर्चा, निलेश भेगडे संचालक, शंकरराव शेलार नागरी सहकारी पतसंस्था, बाळासाहेब शेलार माजी अध्यक्ष, देहूरोड शहर भाजपा, राहुल काकडे उपाध्यक्ष, तळेगाव शहर भाजपा, सचिन मराठे उपाध्यक्ष, रवींद्र काळोखे किसान मोर्चा अध्यक्ष, कुमार ऋत्विक मोरे अध्यक्ष, विद्यार्थी आघाडी, प्रद्युम्न राजेश टिळेकर सरचिटणीस, युवा मोर्चा, प्रवीण कांबळे, संदीप परंडवाल, प्रशांत मेंडके, विशाल काकडे, अंकुश काकडे, सचिन शेलार बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, पुणे जिल्हा, योगेश शेलार, अक्षय मुऱ्हे, अक्षय शेलार, प्रीतम कदम, अनिल जाधव, राजू जाधव, अश्विन ठाकर आदी मान्यवर उपस्थित होते.
यावेळी भारतीय जनता पार्टीचे सर्व आजी-माजी व ज्येष्ठ पदाधिकारी, महिला पदाधिकारी तसेच सर्व मोर्चांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी शांताराम बापू कदम, राजेश मुऱ्हे, सचिन घोटकुले, रघुवीर शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी बाबू कोळी, अनिल शेलार, श्याम मोहिते, सचिन शेलार, योगेश शेलार, मयूर शेलार, चंद्रकांत ढवळे, अनिल धामणकर, मितेश चौधरी, राहुल जाधव, अश्विन केदारी, संदीप भालेराव, ज्ञानेश्वर जाधव, सुरेश केदारी, राजू गावडे, राहुल काकडे, विशाल काकडे, सौ. सोनाली शेलार यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्श हॉस्पिटलच्या वतीने डॉ. अमित वाघ, डॉ. अनिल बनके व त्यांच्या सर्व टीमने आरोग्य शिबिराचे नियोजन व आयोजन केले. या सेवाकार्यात सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणारे सर्व मान्यवर, भाजपा पदाधिकारी, ज्येष्ठ नेते, महिला पदाधिकारी, सर्व मोर्चांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, डॉक्टरांची टीम आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व अभिनंदन !

सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करा, शांतता भंग होऊ देऊ नका : पो.नि.बाळासाहेब रोकडे

बिलोली । प्रतिनिधी
सोशल मीडियाचा वापर ज्ञानात भर पाडण्यासाठी करावा. अनेक विद्यार्थी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले आयुष्य घडवित आहेत. मात्र आपण ज्या समाजात राहतो, तेथील सामाजिक शांतता भंग होणार नाही याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी, असे आवाहन बिलोली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांनी केले. दि.६ नोव्हेंबर रोजी बिलोली जामा मशिद येथे बिलोली पोलीस ठाण्याच्या वतीने मुस्लिम समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना पो. नि. रोकडे बोलत होते.
पुढे बोलताना पो.नि.रोकडे म्हणाले, कोणत्याही महापुरुषांबद्दल किंवा सन्माननीय व्यक्तींबद्दल टिप्पणी करताना अत्यंत काळजी





घेतली पाहिजे. प्रत्येक महापुरुषांचे कार्य आणि योगदान महान आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करणे टाळावे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेचा (-ख) वापर करून महापुरुषांचे अथवा सन्माननीय व्यक्तींचे फोटो मॉर्फ करणे, त्यात फेरफार करून आक्षेपार्ह स्वरूप देणे, असा मजकूर व छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करणे टाळावे. सोशल मीडियावर अशा प्रकारचा मजकूर आढळल्यास तो लाईक, शेअर अथवा फॉरवर्ड करू नये, असे आवाहनही त्यांनी केले. अशा प्रकारच्या पोस्टमुळे समाजात गैरसमज आणि सामाजिक तेढ निर्माण होऊ शकतो. एखादी आक्षेपार्ह घटना घडल्याचे सांगून संबंधित मजकूर पुन्हा स्टेटसवर ठेवणेही योग्य नाही. अशा कृतींमुळे तो मजकूर अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून शांतता भंग होण्यासह कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने सोशल मीडियाचा वापर अत्यंत जबाबदारीने करावा, असे रोकडे म्हणाले.
विशेषतः कुटुंबातील युवक, अल्पवयीन मुले-मुली तसेच सोशल मीडिया हाताळण्याबाबत पुरेसे ज्ञान नसलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी वेळ देऊन योग्य मार्गदर्शन करावे. सोशल मीडियाचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, कोणत्या गोष्टी टाळाव्यात, याबाबत कुटुंबात जागरूकता निर्माण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी बिलोली शहरातील सर्व मशिदींचे इमाम, मशिद समितीचे पदाधिकारी, मुस्लिम समाज बांधव, नगरसेवक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोणी बु येथे घराला आग लागुन झालेल्या नुकसान भरपाईची मागणी

रिसोड । प्रतिनिधी
रिसोड तालुक्यातील लोणी बु येथील रहिवासी असलेल्या कविता रामचंद्र इंगोले ह्या दुपारी ४ च्या सुमारास काही कामा निमित्त बाहेर दरवाजा बंद करून गेल्या असताना घरामध्ये कुणीही नव्हते. दि६/११/२६ रोजी सायंकाळच्या सुमारास साडेपाच च्या दरम्यान अचानक आग लागली घरातून धूर निघत असल्याचे पाहुन शेजाऱ्या पाजाऱ्या लोकांनी धावपळ केली परंतु दरवाजा बाहेरून बंद असल्या कारणाने तो उघडण्याकरिता प्रयत्न करणे पडले तोपर्यंत आगीत बरेच साहित्य जळून खाक झाले. जवळपास घरातील सर्वच साहित्य जळून खाक झाले.



दि७/११/२६ रोजी महसूलचे कर्मचारी तलाठी डुकरे यांनी घटना स्थळी जाऊन पंचनामा केला असता त्यांना त्यांना जवळपास १ लाख ८६ हजार रुपयाचे नुकसात झाले असून पंचनामा करतेवेळी गावातील नागरीक रावसाहेब सानप विनोद बोडखे वैभव सुनिल बोडखे आरविंद इंगोले घरमालक कविता रामचंद्र इंगोले जयश्री गुलाब इंगोले व इतर जण उपस्थित होते. यावेळी घरा मध्ये असलेल्या वस्तु टिव्ही कपाट पंखा गहु किराणा साहित्य सोयाबीन विक्री ची रोख रक्कम गॅस शेगडी फ्रिज कूलर व इतर साहित्याचे नुकसान झाले आहे. कविता रामचंद्र कांबळे ह्या चे कुटुंब गरीब परिस्थित जीवन जगत असून हातावर काम करून संसाराचा गाडा चालवत असे ऐन दिवाळीच्या तोंडावर त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली असून शासनाने झालेल्या नुकसान भरपाईपोटी त्यांना आर्थिक मदत देऊन त्यांना मदत करावी अशी मागणी लोणी गाव कऱ्याकइन सर्वच स्तरातून होत आहे.

चिमुकल्यांच्या स्वप्नांना नवी भरारी; आयुक्त दाम्पत्याची स्नेहवनमधील मुलांसोबत दिवाळी!

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसोबत डॉ. विजय सूर्यवंशी व डॉ.आरती सूर्यवंशी यांनी साजरा केला आनंदाचा सण; फराळासोबत शिक्षणासाठी टॅबची अनमोल भेट

पिंपरी । प्रतिनिधी
दिवाळी म्हणजे आनंदाची देवाणघेवाण, प्रेमाची उधळण आणि नात्यांमधील जिव्हाळा जपण्याचा सण! याच सणाचा खरा आनंद समाजातील गरजू मुलांच्या चेहऱ्यावर फुलविण्याचा संवेदनशील प्रयत्न पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि त्यांच्या पत्नी डॉ. आरती सूर्यवंशी यांनी केला. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी कार्यरत असलेल्या 'स्नेहवन' संस्थेतील चिमुकल्यांसोबत त्यांनी दिवाळीचा आनंद साजरा केला. मुलांसोबत फराळाचा गोडवा वाटला, त्यांच्या स्वप्नांना जाणून घेतले आणि शिक्षणाच्या वाटेवर नवी भरारी घेण्यासाठी टॅबची अनमोल भेट दिली. आयुक्त दाम्पत्याच्या या प्रेमळ भेटीने स्नेहवनमधील मुलांची दिवाळी केवळ प्रकाशमयच झाली नाही, तर त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे आणि आत्मविश्वासाचे नवे हास्यही फुलले.
आळंदीपासून साधारण १० किलोमीटर वर कोयाळी फाटा येथे स्नेहवन नावाची संस्था अशोक देशमाने व त्यांच्या पत्नी अर्चना देशमाने हे चालवतात. या संस्थेत



जात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी व त्यांच्या पत्नी डॉ.आरती सूर्यवंशी यांनी दिवाळी सण साजरा केला. स्नेहवनमधील मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य, त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने आणि शिकण्याची जिद्द अनुभवताना आयुक्त दाम्पत्यही भारावून गेले. डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संस्थेच्या संपूर्ण प्रकल्पाची पाहणी करून तेथील विविध उपक्रमांची माहिती घेतली. मुलांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लागावा, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्ञानाची नवी दालने खुली व्हावीत, यासाठी आयुक्तांनी मुलांना टॅब भेट दिले. ही भेट म्हणजे केवळ एक उपकरण नव्हे, तर त्यांच्या स्वप्नांना दिलेली नवी दिशा होती.

आत्मविश्वास कधीही हरवू देऊ नका; शिक्षण घेणे थांबवू नका!

या भेटीतील सर्वांत भावस्पर्शी क्षण ठरला तो म्हणजे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, डॉ.आरती सूर्यवंशी आणि मुलांमधील मनमोकळा संवाद. मुलांनी आयुक्तांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अडचणी, सरकारी अधिकारी होण्यासाठी केलेला संघर्ष, महापालिकेचे कामकाज आणि गरजू नागरिकांची कामे कशा पद्धतीने मार्गी लावली जातात, असे अनेक प्रश्न विचारले.
मुलांच्या प्रत्येक प्रश्नाला आयुक्तांनी अत्यंत आपुलकीने उत्तरे दिली. आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी विट्टी-दांडू, सुरपारंब्यासारख्या खेळांचा उल्लेख केला. आर्मी ऑफिसर म्हणून झालेली निवड, त्यानंतर कस्टम अधिकारी, सहकार विभागातील काम, कोल्हापूर आणि रायगड येथील प्रशासकीय जबाबदाऱ्या, जिल्हाधिकारी आणि पुढे महानगरपालिका आयुक्त म्हणून केलेला प्रवास त्यांनी मुलांसमोर उलगडला. ते म्हणाले, शिक्षण घेताना अडचणी येऊ शकतात; मात्र आपला आत्मविश्वास कमी पडता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत शिक्षण घेणे थांबवू नका. रोज काहीतरी नवीन शिका, नियमित अभ्यास करा आणि वाचनाची सवय लावा. आयुष्यात पुढे जाण्यासाठी जिद्द आणि सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे.
सरकारी सेवेतील आपल्या अनुभवातून त्यांनी मुलांना एक मोलाचा संदेशही दिला. आपल्याकडे काम घेऊन येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर हसू आले पाहिजे. गरजू लोकांची मदत करणे, त्यांची कामे मार्गी लावणे, हा प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याचा विचार असला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. यावेळी मुलांनी त्यांच्या वाचनाची आवड, त्यांनी वाचलेली पुस्तके तसेच टेस्लासारख्या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील घडामोडींबाबतही उत्सुकतेने प्रश्न विचारले. मुलांच्या या जिज्ञासू वृत्तीचे आयुक्तांनी कौतुक केले. 'मला तुमच्या गोष्टी ऐकायच्या आहेत. लहानपणी तुम्हाला कोणत्या अडचणी आल्या, हेही मला जाणून घ्यायचे आहे,' असे म्हणत त्यांनी मुलांशी संवाद अधिक जिव्हाळ्याचा केला. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नावर बोलताना डॉ. सूर्यवंशी यांनी अत्यंत भावनिक आवाहन केले. राज्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती असली, तरी शेतकऱ्यांनी आपल्या कुटुंबाचा आणि मुलांच्या भवितव्याचा विचार करून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये. कितीही कठीण काळ असला तरी शासन आपल्या पाठीशी आहे. कोणताही वाईट काळ कायम राहत नाही. धैर्याने आणि संयमाने त्याला सामोरे गेले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

आमदार अण्णासाहेब बनसोडे व नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे यांच्या सौजन्याने दिवाळी पहाट रंगली

अभिनेत्री भाग्यश्री (टिना) शर्मा घेवारेंचा पुढाकार; स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना मिळाले हक्काचे व्यासपीठ!

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी
महाराष्ट्र राज्य विधानसभा उपाध्यक्ष तथा पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णासाहेब दादू बनसोडे आणि प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक सिद्धार्थ अण्णासाहेब बनसोडे यांच्या सौजन्याने अखिल पिंपरी-चिंचवड कलामंचच्या वतीने दिवाळी पहाट, सांस्कृतिक कार्यक्रम व फराळ वाटपाचे आयोजन (दि.८) करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रथमच शहरातील स्थानिक कलाकारांनी एकत्र येत विविध कलांचे सादरीकरण करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा भाग्यश्री (टिना) शर्मा घेवारे तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्राची लोकधारा, अभंग, भक्तिगीते, भावगीते, हिंदी व मराठी गाणी, लावणी, लोकगीते आणि काव्यरचना अशा विविध कलाप्रकारांतून महाराष्ट्राच्या समृद्ध कला-संस्कृतीचे दर्शन घडले.
या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष मा. अण्णा दादू बनसोडे साहेब आणि सिद्धार्थ भाऊ अण्णा बनसोडे यांच्या वतीने पिंपरी-चिंचवडमधील कलाकारांसाठी दिवाळी पहाट, सांस्कृतिक कार्यक्रम व फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. दिवाळीच्या मंगलमय वातावरणात हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि आनंदात पार पडला.
या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मुजफ्फर इनामदार पत्रकार, चंद्रकांत पवार आंतरराष्ट्रीय गायक, राजेंद्र जगताप (राष्ट्रवादी नेते), सूर्यकांत पवार चित्रपट निर्माते आणि पुरुषोत्तम हिंगणकर महाराज कीर्तनकार हे मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.या कार्यक्रमामध्ये स्थानिक कलाकारांनी गायन, वादन, लावणी आणि महाराष्ट्राची समृद्ध लोकधारा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आपल्या महाराष्ट्राच्या कला आणि संस्कृतीचे सुंदर दर्शन या कार्यक्रमातून



घडले.
यावेळी भाग्यश्री (टिना) शर्मा घेवारे म्हणाल्या की, अण्णा दादू बनसोडे साहेब यांचे विशेष आभार व्यक्त करते.कारण पिंपरी-चिंचवडमधील कलाकारांच्या पाठीशी ते नेहमीच खंबीरपणे उभे राहतात. कलाकारांना प्रोत्साहन देणे, त्यांना संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कलाविश्वाला बळ देणे यासाठी त्यांचे सातत्याने सहकार्य लाभत आहे. त्यामुळे ते अखिल पिंपरी चिंचवड कलामंचचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. तसेच या कार्यक्रमासाठी अत्यंत कमी वेळात हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉल्फिन्स गार्डन स्टुडिओ सांगवी हॉलचे सर्वेसर्वा राज सोमवंशी व त्यांच्या टीमचेही विशेष आभार व्यक्त करते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना एकत्र आणणे, त्यांच्या कलागुणांची ओळख निर्माण करून देणे आणि त्यांना पुढील काळात अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. आज अनेक कलाकारांकडे कला आहे, गुणवत्ता आहे; मात्र त्यांना योग्य व्यासपीठ आणि संधी मिळण्याची गरज आहे. पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक कलाकारांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांच्या कलेला योग्य सन्मान आणि ओळख मिळवून देण्यासाठी अखिल पिंपरी चिंचवड कलामंच यापुढेही सातत्याने कार्यरत राहील, असा विश्वास घेवारे यांनी व्यक्त केला. गायन क्षेत्रात विद्या गायकवाड नढे, गायत्री साळवे, अशोक टाकळे, मनीषा इंगोले, जगन्नाथ खाडे, शेखर चांदणे, अमित देशमाने, प्रतीक सत्वाधीर, रेखा दुसाने, कोमल भोसले, सागर डाडर, संतोष माहेश्वरी, प्रमोद कुलकर्णी, सविता कोरडे, कविता तळेकर, मनीषा सपकाळे, सुरेखा कुलाल यांनी आपल्या सुमधुर गायनाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. ध्वनी व्यवस्था व निवेदनासाठी सुनील पाटील टेक्नॉलॉजी साऊंड यांनी उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था उपलब्ध करून दिली. लीनेश घाडगे आणि विक्रांत शिंदे यांनी निवेदनाची जबाबदारी सांभाळली.
वाद्यवृंदामध्ये सेन कुमार, श्रीराम इंगळे, अशोक जाधव, विलास अडागळे, सोमनाथ कांबळे, राजकुमार काजोरिया, लखन अडागळे, गोकुळ, रोहन कळदकर यांनी आपल्या वादनाने कार्यक्रमात रंगत आणली. लावणी नृत्य सादरीकरणामध्ये वृषाली सातपुते, भारती मोरे, सुजाता कुंभार आणि फिरोज मुजावर यांनी बहारदार लावणी सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. महाराष्ट्राची लोकधारा या विशेष सादरीकरणातून रवी कांबळे, सँडी पाटील, सिद्धांत घागरमले, कावेरी गंगाळे, आकाश गायकवाड, रवींद्र शिंदे, लीनेश घाडगे, अमोल अडागळे आणि भाऊसाहेब सांगळे यांच्या ग्रुपने महाराष्ट्राच्या लोककलेचा सुंदर आविष्कार सादर केला. तसेच प्रकाश नवगिरे, मनीषा बाराथे, मेबल अल्लूहाट, मंगला पवार व मोनिका शिंदे यांच्यासह कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, कलाकारांचे, पदाधिकाऱ्यांचे, सदस्यांचे व विशेष रसिक श्रोते आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आणि संस्थेच्या पुढील सामाजिक व सांस्कृतिक वाटचालीसाठी सर्वांनी भरभरून शुभेच्छा दिल्या.

दिवाळीनिमित्त ८ हजार रुपयांचे अनुदान देण्याचा मेसेज फसवा; नागरिकांनी सावध राहावे!

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी
दिवाळीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व नागरिकांना ८ हजार रुपयांचे रोख अनुदान मंजूर केल्याचा दावा करणारा संदेश सध्या व्हॉट्सपसह विविध सोशल मीडिया माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. मात्र, हा संदेश पूर्णपणे संशयास्पद असून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याच्या उद्देशाने सायबर भामट्यांकडून अशा प्रकारचे संदेश पाठविले जात असल्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा संदेशांपासून सावध राहावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सायबर विभागाने केले आहे.
प्रसारित होणाऱ्या संदेशामध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक करून अनुदान मिळविण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन केले जात आहे. मात्र, या लिंकद्वारे नागरिकांची वैयक्तिक तसेच बँकिंगविषयक गोपनीय माहिती चोरली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अनोळखी संदेशावर विश्वास ठेवू नये, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.
नागरिकांनी ८ हजार रुपयांच्या अनुदानाबाबत आलेल्या अनोळखी संदेशांवर विश्वास ठेवू नये, व्हॉट्सपवरील संशयास्पद लिंक उघडू नयेत, अनुदान मिळविण्यासाठी कोणतेही शुल्क अथवा पैसे भरू नयेत. तसेच गुगल, सोशल मीडिया किंवा इतर सर्च इंजिनवर दिसणाऱ्या अनोळखी वेबसाइटवर आपली माहिती भरू नये. कोणत्याही वेबसाइटची सत्यता व अधिकृतता तपासल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवू नये. आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक खाते तसेच इतर गोपनीय माहिती अनोळखी लिंकवर भरू नये. कोणालाही ओटीपी, एटीएम पिन, सीव्हीव्ही किंवा यूपीआय पिन सांगू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.
सरकारी योजनांची माहिती केवळ अधिकृत सरकारी संकेतस्थळांवरूनच तपासावी. अशा प्रकारचे फसवणुकीचे संदेश इतरांना फॉरवर्ड करू नयेत. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा ु.लूलशीलीळाश.सीं.ळप या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी.
'सतर्क राहा, सुरक्षित राहा!' असा संदेश देत पोलीस उपआयुक्त (गुन्हे) रोहिदास पवार यांनी नागरिकांना सायबर फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

Page 3_Layout 1 11/8/2026 11:42 PM Page 1

NSL SUGARS
Sustainable Food, Fuel & Power
एन एस एल शुगर्स लिमिटेड युनिट 3
जय महेश पवारवाडी तालुका माजलगाव जिल्हा बीड
सर्व ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार,मजुर,शेतकरी, कर्मचारी,कामगार व अधिकारी यांना
दिवाळी सणा निमित्त
हार्दिक हरर्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
के.व्ही.व्ही.एस.नारायण मुर्ती युनिट हेड
पारसनाथ जायसवाल जनरल मॅनेजर

दीपावली निमित्त आमचे ग्राहक, सभासद, ठेवीदार, कर्जदार व सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!
।। सहकार हेच सामर्थ्य ।।
महेश अर्बन को-ऑप बँक लि;
परळी वैजनाथ. जि.बीड.
आपला विश्वास... आपली बँक...
मुख्य कार्यालय- सर्व्हे क्रं. ९६८, घर क्रं. ५१/अ, वॉर्ड क्रं. ७, मोंढा मार्केट, परळी-वैजनाथ. ४३१ ५१५ जि.बीड.
फोन ०२४४६-२२६१८१ e-mail : parlimaheshbank@gmail.com, IFS Code : HDFC0CMUBKP
ठेवीवरील व्याजदर
७ दिवस ते ९० दिवस 6.00%
९१ दिवस ते १८० दिवस 7.00%
१८१ दिवस ते ३६५ दिवस 8.00%
३६६ दिवस ते २४ महिने 8.50%
२४ महिने १ दिवस ते ३६ महिने 9.00%
ज्येष्ठ नागरिकांना 0.५0% जास्त व्याजदर
रु.५ लाखापर्यंतच्या ठेवीवर विमा संरक्षण
आर.डी., पिग्मी व दामदुप्पट ठेव योजना उपलब्ध
योजना मर्यादित कालावधी साठी आजच बँकेशी संपर्क साधा..
प्रा.श्री.टी.पी.मुंडे (सर) मुख्य मार्गदर्शक व संचालक
श्री.ओमप्रकाशजी सारडा अध्यक्ष
श्री.जनार्धन विठ्ठलराव गाडे (गुरुजी) उपाध्यक्ष
-: संचालक मंडळ :-
श्री.संदीप सुभाषराव टाक, श्री.आत्माराम महादेव कराड, श्री.शिवरत्न व्यंकटराव मुंडे, श्री विजय त्रिंबकराव मुंडे, श्री.भिसरामजी भाऊराव राठोड, श्री.कृष्णा लक्ष्मणराव लोंढे, सौ.शांताबाई नरहरीराव लोखंडे (काकडे), सौ.मिराताई दत्तात्रय ढवळे, श्री.आनंदजी चंद्रप्रकाशजी दाड (तज्ञ संचालक), श्री.आदेशकुमार जवाहरलाल नहार (तज्ञ संचालक)
श्री.के.एम.उपाध्याय (मुख्य कार्यकारी अधिकारी)
आमच्या शाखा :
परळी वैजनाथ - सर्व्हे नं.९६८, मोंढा मार्केट, परळी वैजनाथ. जि.बीड. फोन ०२४४६-२२६१८१
अंबाजोगाई - प्रशांत नगर, सहकार भवन शेजारी, अंबाजोगाई फोन ०२४४६-२४३११८
बीड - दयाराज कॉम्प्लेक्स, १ला मजला, सुभाष चौक, माळी वेस, बीड फोन ०२४४२-२३०३५५
माजलगाव - माऊली मार्केट, मोंढा, माजलगाव, जि.बीड फोन ०२४४३-२३६२३५
गेवराई - माऊली मार्केट, मोंढा रोड, गेवराई, जि.बीड फोन ०२४४७-२६३११८

भोकर नगरपरिषद, भोकर जि.नांदेड
मुख्य प्रशासकीय इमारत
नांदेड रोड, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड-431 801.
ईमेल cobhokar 16@gmail.com दूरध्वनी क्र. (02467) 222299-223399
जा.क्र. पभी का वि/2026 दि.
जाहीर आवाहन
भोकर शहरातील सर्व नागरिकांना याद्वारे जाहिर आवाहन करण्यात येते की,
1.ज्या मालमत्ता धारकांकडे मालमत्ता कर, पाणीपट्टी बाकी आहे त्यांनी आपल्या कडील थकित व चालू कराचा तात्काळ भरणा करावा.
2.कचऱ्याचे विलगीकरण करुन ओला व सुका कचरा वेगवेगळा करुनच नगरपरिषदेच्या घंटागाडीत टाकावा.
3.कचरा उघड्यावर टाकू नये. टाकल्यास आपणास नगरपरिषदेद्वारे दंड आकारला जाईल.
4.पाण्याचा अपव्यय टाळा: पिण्याचे पाणी, भांडी घासणे, कपडे धुणे आणि स्वच्छतेसाठी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करा.
5.पाण्याचा पुनर्वापर करा: आंघोळीचा किंवा तांदूळ धुतलेले पाणी फेकून न देता ते झाडांना घाला.
6.पाण्याची गळती टीसा: घरातील किंवा सार्वजनिक ठिकाणचे नळ गळत असल्यास ते तातडीने दुरुस्त करा.
7.रेन वॉटर हार्वेस्टिंग: पावसाचे पाणी साठवण्यासाठी छतावरील पाणी जमिनीत निरवण्याची व्यवस्था करा.
8.नळांना तुट्या नसल्यास त्वरित तुट्या बसवून घ्या.
9.वृक्षारोपण करा: झाडे लावल्यास आणि ती जगवल्यास भविष्यात दुष्काळाची तीव्रता कमी होण्यास मदत होते.
10.अनधिकृत बॅनर व पोस्टर लावू नका, नगरपरिषदेची परवानगी घेऊनच बॅनर व पोस्टर लावा.
11.आपल्या कुटुंबासह प्रदूषण मुक्त व सुरक्षित दिवाळी साजरा करावी.
कर भरा, जप्ती टाळा.
"पाणी हेच जीवन आहे, आणि त्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे. आज आपण पाण्याचा सन्मान केला, तरच उद्याचे भविष्य सुरक्षित राहील!"
सर्व नागरिकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!
कर भरा जप्ती टाळा. "पाणी हेच जीवन आहे, आणि त्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे. आज आपण पाण्याचा सन्मान केला, तरच उद्याचे भविष्य सुरक्षित राहील!"
श्री. भगवान नारायणराव दंडवे नगराध्यक्ष
श्री. दिलीप गुरप्पा सोनवाडे उपनगराध्यक्ष
श्री. ऋषभ विठ्ठलराव पवार मुख्याधिकारी
सर्व सन्माननीय सभापती, नगरसेवक, नगरसेविका नगर परिषद, भोकर

महाराष्ट्र राज्य काँग्रेस कमिटी
मंठा, तालुका येथे अध्यक्ष
विवेकराव घारे
यांच्या तर्फे
दिवाळीच्या शुभेच्छा!
ही दिवाळी आपणा सर्वांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा !
विवेकराव घारे
महाराष्ट्र राज्य काँग्रेस कमिटी
मंठा, तालुका
सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

जालना महानगर पालिका, जालना
फेर ई-निविदा सुचना जा. क्र. ५३० दिनांक ०६.११.२०२६
आयुक्त, जालना शहर महानगर पालिका जालना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बाधकाम विभागाकडे योग्य त्यावर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगर पालिका जालना कडुन हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान योजना सन २०२५-२६ अंतर्गत एकुण (०२) कामांकरीता व्दिलिफाफा पध्दतीने, इ-१ स्वरुपात फेर ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा कालावधी दिनांक ०६.११.२०२६ दुपारी ०२.०० ने दिनांक १८.११.२०२६ सायं ५.०० पर्यंत असुन सर्व कागदपत्रे दिनांक ०६.११.२०२६ दुपारी ०२.०० ते दिनांक १८.११.२०२६ सायं. ५.०० पर्यंत या वेळेत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास व डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहेत, निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार महानगर पालिका, जालना यानी राखुन ठेवले असुन अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
स्वा/- शहर अभियंता म.न.पा. जालना
स्वा/- अंतर्गत लेखा परिरक्षक म.न.पा. जालना
स्वा/- मुख्यलेखाधिकारी म.न.पा. जालना
स्वा/- आयुक्त म.न.पा. जालना

दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा..!
अजय मुंडे माजी गट नेते

लक्ष्मीपूजनाच्या पवित्र दिवशी तुमच्या जीवनात चैतन्यमय आनंदाचा संचार होवो ! शुभ दिवाळी!
॥ शुभ दिपावली ॥
निमित्त आपणास व आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा...
दिपावली - पाडवा,भाऊ-बीजच्या सर्वांना शुभेच्छा !
संपत्ती, सौख्य, आरोग्य आणि आनंद यांचा वर्षावि होवो..
अन् इडा पिडा जावो.. बलिप्रतिपदा येवो...
मदतीला साथ देत बहिण भावाच्या नात्यात गोडवा येवो.
श्री.प्रद्युम्न राजेश टिळेकर
सरचिटणीस युवा मोर्चा भारतीय जनता पार्टी देहू - देहूरोड शहर मंडल

दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
सृजन
सृजन ॲग्रोटेक प्रोड्युसर कंपनी ली.,अंबाजोगाई
Mail: srujanagrotech@gmail.com CIN NO: U01639MH2023PTC409289
सिताफळ खरेदी व विक्री तसेच सिताफळ पल्प,सिताफळ रबडी,सिताफळ कुल्फी.

दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा..!
प्रा.बाळासाहेब राठोड
संस्थापक अध्यक्ष-श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल

शुभ दीपावली
शुभेच्छुक :
डॉ स्वरूपसिंह हजारी
प्रदेश कार्यकारणी सदस्य भाजपा
माजी नगराध्यक्ष किल्ले धारूर

स्वप्नं अमूल्य असतात, म्हणूनच आधारही मौल्यवान हवा.
महाराष्ट्र नागरी सोने तारण कर्ज
कमीत कमी कागदपत्रे | तात्काळ कर्ज मंजुरी
आपल्या हक्काची आपली पतसंस्था
महाराष्ट्र नागरी
सहकारी पतसंस्था मर्या.माजलगांव
मुख्य कार्यालय : देशमुख कॉम्प्लेक्स, मोंढा कॉर्नर, धारुर रोड, माजलगांव जि.बीड ४३१ १३१
संपर्क : 8378012441
maharashtra.nagri@gmail.com follow us
कार्यरत शाखा :- २. देवडी मो.9970444396 ३. सुलतानपुर (माळेवाडी) मो.8698981841

प्रकाशाचा, आनंदाचा, आणि सौख्याचा सण...
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!
ही दिवाळी आपल्या आयुष्यात सुख, समृद्धी, आरोग्य आणि यश घेऊन येवो, हीच सदिच्छा..!
रणजित रामराजे देशमुख
अध्यक्ष, परळी विधानसभा युवक काँग्रेस

दीपांच्या प्रकाशाने आपल्या आयुष्यात आनंद, समृद्धी आणि आरोग्याची वर्षावि होवो !
शुभ दिपावली
निमित्त मंगलमय शुभेच्छा
शुभेच्छुक:
गिरीश कोत्तावार
विश्वनाथ पवार
काँग्रेस कार्यकर्ता

दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., परभणी
बँकेचा IFSC Code : YESB0PDBH01 (वायईएसबीझिरोपीडीबीएचओवन)
बँकींग परवाना क्र. - आरपीसीडी/म.प्रा.का./1905/18.01.038 2011-12 दि. 14.02.2012
सहकाराच्या माध्यमातून औद्योगिक विकास, आर्थिकदृष्ट्या क्रांती घडविणारी व सर्वसामान्य शेतकऱ्यांना त्यांच्या आर्थिक गरजांसाठी पतपुरवठा करणारी
शेतकऱ्यांची अग्रणी बँक
ऑडीट वर्ग " अ" दिनांक ३१.०३.२०२६ अखेर
बँकेचे ठेवीवरील नवीन व्याजदर दिनांक १६ /०७/२०२५ पासून लागू
१५ दिवस ते २९ दिवसांपर्यंत ४.५० %
३० दिवस ते ९० दिवसांपर्यंत ५.५०%
९१ दिवस ते १८० दिवसांपर्यंत ६.००%
१८१ दिवस ते ३६४ दिवसांपर्यंत ६.७५%
१२ महिने ते २४ महिने ७.२५ %
२५ महिने ते ३६ महिने ७.२५ %
३७ महिने ते १२० महिने ५.५०%
६० वर्षांपरील नागरिक ठेवीदारास तसेच महिलांसाठी उपरोक्त व्याजदारपेक्षा ०.५० % जास्त
सांपत्तीक परिस्थिती दिनांक ३१/०३/२०२६
अ.क्र. तपशील रु.लाखात
1 भाग भांडवल 8730.24
2 निधी 45215.46
3 ठेवी 220115.70
4 बाहेरील कर्ज 25667.17
5 कर्ज येणे बाकी 173469.49
6 गुंतवणूक 87273.87
7 बसुली मार्च अखेर (मुद्दल + व्याज) 54753.11
8 संचित नफा 2125.66
9 सेवते भांडवल 310578.25
10 सौदी रेशो 76.81
11 नक्त मुल्य 23525.04
ठळक वैशिष्ट्ये
* परभणी व हिंगोली जिल्ह्याभरात 103 शाखांचे जाळे * 2 हजार कोटी पेक्षा जास्त ठेवी * स्वमालकीची अद्यावत सॉफ्टवेअर डाटा सेंटर * अद्यावत संगणक प्रणाली * कोअर बँकिंग (CBS) द्वारे सर्व शाखा ऑनलाईन * अत्याधुनिक सुरक्षीत लॉकर्सची व्यवस्था * कर्ज सुविधा * शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्डवर कर्जवाटप * बचत गटास कर्ज वाटप * पगारदार सभासदांना कर्ज वाटप * पगारदार कर्मचाऱ्यांना वैयक्तिक सी.सी. कर्ज सुविधा * शेतकरी मंडळाची स्थापना ग्राहकांना ATM/POS ची सुविधा उपलब्ध आहे * RTGS/NEFT मार्फत कुठेही पैसे पाठविण्याची सुविधा * एस.एम.एस.अलर्ट सुविधा * शेतकरी सभासदांसाठी रुपे किसान क्रेडीट कार्ड * डायरेक्ट बेनीफिट ट्रान्सफर योजना (DBTL) PMJBY/PMSBY योजना * चेक ट्रान्सफर सिस्टिम (CTS) क्लिअरिंग * सुपर सुकन्या समृध्दी ठेव योजना * वैयक्तिक गृह कर्ज व सोने तारण कर्ज सुविधा * मा. जिल्हाधिकारी कार्यालय व जि.म.स.बँक यांच्या संयुक्त विद्यमानाने Online पोर्टलद्वारे एकाच वेळी 24 तासात अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात. (शेतकरी शासन अनुदान व निराधार शासन अनुदान इ.) * Face Reading मशिनद्वारे निराधारांना अनुदानाचे वाटप * मायक्रो एटीएम सुविधा
* बँकांच्या सर्व शाखांमधून PMJBY/PMSBY विमा योजनेचे फॉर्म भरुन खातेदार सभासदांनी योजनेचा लाभ घ्यावा.
* वैयक्तिक कर्जदार सभासदांना रुपये 25.00 लाख विमा कवच बँकेमार्फत देण्यात येते.
* रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार केवायसी करुन घेणाऱ्या सभासदांना शासनाच्या विविध योजना अनुदानाचा लाभ तत्परतेने मिळेल, तसेच खातेदारांनी आपल्या खात्यास वारसांची नोंद करुन घ्यावी.
मा.रामप्रसादजी बागमसार कदम बोर्डीकर अध्यक्ष
मा.राजेश साहेबराव पाटील उपाध्यक्ष
मा.व्ही.आर. कुरुंदकर मुख्य कार्यकारी अधिकारी
* विद्यमान संचालक मंडळ *

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.०९ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



उदगीर ग्रामीण पोलिसांची प्रतिबंधित गुटख्यावर कारवाई

१३ लाख ७७ हजार ९६० रुपयांचा गुटखा व स्कॉर्पिओ जप्त; नांदेडच्या आरोपीस अटक

लातूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची अवैधरित्या वाहतूक करून विक्री करण्याच्या उद्देशाने घेऊन जाणाऱ्या आरोपीस उदगीर ग्रामीण पोलिसांनी अटक केली असून, या कारवाईत प्रतिबंधित गुटखा व महिंद्रा स्कॉर्पिओ वाहन असा एकूण १३ लाख ७७ हजार ९६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास लोणी मोड, उदगीर येथे महिंद्रा कंपनीची पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ वाहन क्रमांक चक-१४-उक-३२३२ मधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले पानमसाला व सुगंधित तंबाखूजन्य पदार्थ विक्रीच्या उद्देशाने वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये विमल पानमसाला, त-१ तंबाखू, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, रजनीगंधा असे प्रतिबंधित पदार्थ आढळून आले. पोलिसांनी सदर प्रतिबंधित पदार्थ व महिंद्रा स्कॉर्पिओ वाहन असा एकूण १३,७७,९६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी निसार हसनमिया शेख, वय ४९ वर्षे, रा. गवळीपुरा, स्टेशन रोड, नांदेड यास अटक करण्यात आली आहे.

याप्रकरणी पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७९६/२०२६, कलम १२३, २२३, २७४, २७५, ६२ भारतीय न्याय संहिता तसेच कलम ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तिडके हे करीत आहेत. पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डी.डी. गाडे, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. आरोग्यास घातक व शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्री व वाहतुकीविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिसांनी केलेल्या या प्रभावी कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांना मोठा इशारा मिळाला आहे.



कृषी तज्ज्ञ उदय देवळाणकर यांचे १२ नोव्हेंबर रोजी व्याख्यान व भूमिपुत्रांचा सत्कार

उदगीर । पाटील मनेश

आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक शेतीचा मेळ घालणे काळाची गरज आहे. शेती व जलसंधारण नियोजन या विषयावर जेष्ठ कृषी तज्ज्ञ उदय देवळाणकर



यांच्या व्याख्यानाचे आयोजन व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे व पदावर नियुक्ती झालेले भूमिपुत्र यांचा सत्कार दि.१२ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वा. उदगीर तालुक्यातील गुडसूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात केले आहे.

आपल्या व्याख्यानात प्रमुख पाहुणे उदय देवळाणकर हे बदलत्या हवामानात आणि जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे आवश्यक आहे. तसेच, उत्पादन खर्चात बचत करून उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. भारतीय शेतीपुढील आव्हाने, हवामान बदल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) या विषयावर ते प्रकाश टाकणार आहेत. पारंपरिक आणि सेंद्रिय शेतीची सांगड घालत कोरडवाहू शेतीला अधिक सक्षम बनवण्याची गरज आहे. पिकांचे योग्य नियोजन आणि बाजारपेठेचा अभ्यास केल्यास शेतकऱ्यांवर शेतीमाल बेभाव विकण्याची वेळ येणार नाही, यासाठीचे नियोजन कसे करावे, याचे मार्गदर्शन गुडसूरकरांना मिळणार आहे. गुडसूर येथे मागील चार वर्षापासून दीपावली मेजवानी म्हणून गावकऱ्यांसाठी मार्गदर्शन व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हे यंदाचे पाचवे वर्ष आहे. वर्षभरात गावातील भूमिपुत्रांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली तसेच काही विद्यार्थी विविध पदांवर नौकरीस लागले त्यांचा सत्कार ग्राम विकास मंच गुडसूर तर्फे केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी परिसरातील व गावातील जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन ग्राम विकास मंचचे पदाधिकारी व सभासदांनी केले आहे.

लातूर-हडपसर दिवाळी स्पेशल रेल्वे संपूर्ण नोव्हेंबर महिना सुरू ठेवा; खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांना निवेदन!

रेल्वे संघर्ष समिती, मुरुडची मागणी; रेल्वेच्या फेऱ्या वाढविण्यासाठी मध्य रेल्वेला पत्रव्यवहार करण्याचे खासदारांचे आश्वासन

लातूर । प्रतिनिधी



लातूर-हडपसर दिवाळी स्पेशल रेल्वे संपूर्ण नोव्हेंबर महिना सुरू ठेवावी, तसेच या रेल्वेच्या फेऱ्यांमध्ये वाढ करावी, अशी मागणी रेल्वे संघर्ष समिती, मुरुडच्या वतीने खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. दि. ७ नोव्हेंबर २०२६ रोजी डॉ. काळगे हॉस्पिटल, लातूर येथे हे निवेदन देण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही मध्य रेल्वेने २ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत लातूर-हडपसर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू केली आहे. मात्र, ही रेल्वे केवळ चार दिवसांसाठी सुरू असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. यंदा दिवाळीचा सण ५ ते ११ नोव्हेंबरदरम्यान असल्याने अनेक नागरिक सणाच्या आधी, सणाच्या काळात तसेच सणानंतर आपल्या गावी ये-जा करतात.

पुणे येथे लातूर व धाराशिव परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये शाळा व महाविद्यालयांना २० ते २५ दिवसांची सुट्टी असल्याने विद्यार्थी, नोकरदार आणि इतर प्रवाशांची पुणे-लातूर-धाराशिव मार्गावर मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. त्यामुळे हडपसर-लातूर दिवाळी स्पेशल रेल्वेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळतो. दिवाळीच्या काळात खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून तिकिटांचे दर मोठ्या प्रमाणात वाढविले जातात. त्यामुळे सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना खासगी प्रवास परवडत नाही. अशा परिस्थितीत रेल्वे हा सर्वसामान्य प्रवाशांसाठी परवडणारा आणि सोयीचा पर्याय आहे. त्यामुळे लातूर-हडपसर दिवाळी स्पेशल रेल्वे संपूर्ण नोव्हेंबर महिना सुरू ठेवावी, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली.

या मागणीला खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. रेल्वेच्या फेऱ्या वाढविण्यासाठी मध्य रेल्वेकडे पत्रव्यवहार करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी लातूर-हडपसर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू केल्याबद्दल खासदारांचे अभिनंदन करण्यात आले तसेच त्यांना दिवाळीच्या शुभेच्छाही देण्यात आल्या. याप्रसंगी पंकज गायकवाड (पंचायत समिती सदस्य, लातूर), भक्तावर बागवान (माजी तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, लातूर), विजयकुमार राजमाने (जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, लातूर), सतीश अंधारे, अक्षय चव्हाण (माजी ग्रामपंचायत सदस्य, मुरुड), सतीश मिसाळ, प्रमोद गाडे, मोहित डोळसे, डी. उमाकांत, अक्षय वाघमारे, कृष्णा भालेकर आदी उपस्थित होते.

भादेकर दक्ष नागरिकांची भादा गावात गतिरोधक बसविण्याची ग्रामपंचायत मार्फत सा.बां.कडे मागणी

औसा । बी.डी. उबाळे

तालुक्यातील रामा क्र २३९ औसा भादा गावामध्ये गावातील ग्रामपंचायत कार्यालया समोर व भीम नगर मध्ये गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्याबाबत पाटील मन्मथ बाबुराव व इतर ग्रामस्थ, भादा यांनी गतिरोधक बसविण्याबाबतचा अर्ज ग्राम पंचायत कार्यालयाकडे सादर केला आहे.

यामध्ये भादा गावातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर अवजड आणि दुचाकी, बस, ट्रॅक्टर सह इतर अनेक वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असून वाहनचालकांकडून अतिवेगाने वाहने चालविली जात आहेत. त्यामुळे गावामध्ये वारंवार गंभीर तसेच किरकोळ स्वरूपाचे अपघात घडत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. यामुळे ग्रामस्थ, महिला, लहान मुले, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, पशू व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत दक्ष ग्रामस्थ यांनी ग्रामपंचायत कार्यालयाकडे लेखी अर्ज सादर करून संभाव्य अपघात टाळण्यासाठी गावातील दोन ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार खालील दोन ठिकाणी गतिरोधक बसविणे आवश्यक आहे.

१.ग्रामपंचायत कार्यालयासमोर,२ भीम नगर (मरई मंदिराजवळ,) भादा येथे तात्काळ गतिरोधक बसविणे आवश्यक आहे. याबाबत ग्रामपंचायत कार्यालय भादा यांनी सार्वजनिक बांधकाम उप विभागीय अभियंता उपविभाग औसा यांना लेखी स्वरुपात पत्र देऊन पुढील बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करावी व रस्त्याची मालकी, तांत्रिक निकष व शासनाच्या प्रचलित नियमांनुसार योग्य त्या ठिकाणी आवश्यक गतिरोधक बसविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. तसेच संभाव्य अपघात टाळण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर कामास प्राधान्य देऊन आवश्यक तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी.आपण तातडीने योग्य ती कार्यवाही कराल, अशी अपेक्षा आहे. असे लेखी स्वरूपात पत्र देण्यात आले असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी यांनी कळविले आहे.

कर्जवसुलीसाठी जाणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

शिवीगाळ, मारहाण व धमक्यांच्या घटनांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण; पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत कठोर कारवाईची मागणी

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील विविध बँका, आरबीआय नोंदणीकृत बिगर बँकिंग वित्तीय संस्था (छइऋऊ) तसेच मायक्रोफायनान्स संस्थांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागात कर्जवसुलीसाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाण, धमकावणे तसेच अडवणूक करण्यासारख्या घटनांना सामोरे जावे लागत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कर्मचाऱ्यांच्या वतीने लातूरचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले.



या निवेदनातून कर्जवसुलीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्यांना मारहाण करणे, धमकावणे किंवा त्यांच्या कामात अडथळे निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच सोशल मीडियावर कर्मचाऱ्यांविरोधात चिथावणीखोर संदेश प्रसारित करून वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

बँका व वित्तीय संस्थांमध्ये काम करणारे कर्मचारी हे संस्थेच्या नियमावलीनुसार आणि वरिष्ठांच्या निर्देशानुसार आपले कर्तव्य पार पाडतात. कर्जाचे व्याजदर निश्चित करणे, कर्ज मंजूर करणे अथवा संस्थेची धोरणे ठरविणे हे त्यांच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. त्यामुळे संस्थांच्या धोरणांबाबत असलेला रोष संबंधित कर्मचाऱ्यांवर काढणे अन्यायकारक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले.

यावेळी लातूर जिल्ह्यातील विविध बँका, एनबीएफसी आणि मायक्रोफायनान्स संस्थांचे कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्या जीविताचे व सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली.

उदगीरच्या बाह्यवळण चार पदरी रस्त्यासाठी ३५ कोटींचा निधी मंजूर

माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांच्या प्रयत्नांना यश; शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार

उदगीर । पाटील मनेश

उदगीर शहरातील वाढती वाहतूक आणि दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्रीय मार्ग निधी (उठखत्रु) अंतर्गत उदगीर शहरातील नळेगाव रोड ते बिदरकडे जाणाऱ्या बाह्यवळण चार पदरी रस्त्याच्या ४.२० किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी तब्बल ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी दिली आहे.

आ.संजय बनसोडे यांनी या रस्त्याच्या कामासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांना यश आले असून, या निधी मंजुरीमुळे उदगीरच्या विकासाला आणखी गती मिळणार आहे. उदगीर शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, शहरात वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच शहरातून जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचा ताण निर्माण होतो. परिणामी नागरिकांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः शहरातून जाणाऱ्या वाहनांमुळे अंतर्गत रस्त्यांवरील वाहतुकीवरही परिणाम होत असून, नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



ही समस्या लक्षात घेऊन माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी उदगीर शहरातील बाह्यवळण रस्त्याच्या विकासासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश आले असुन केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत ४.२० किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून नळेगाव रोड ते बिदरकडे जाणाऱ्या बाह्यवळण रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शहरातून जाणाऱ्या अवजड वाहनांना बाह्यवळण मार्गाचा वापर करता येणार असून, शहरातील मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल. तसेच प्रवासाचा वेळ वाचणार असून, अपघातांचा धोका कमी होण्यासही हातभार लागेल. उदगीर शहराच्या भविष्यातील वाढत्या वाहतुकीचा विचार करता हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

३५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्याने उदगीर शहराच्या पायाभूत सुविधा विकासाला मोठे बळ मिळाले आहे. माजी मंत्री आमदार संजय बनसोडेयांच्या प्रयत्नातून मंजूर झालेला हा बाह्यवळण रस्ता शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठप्पा ठरणार असून, नागरिकांमधून या निर्णयाचे स्वागत होत आहे. सदर रस्त्यासाठी ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री सुनिता पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहे.

औसा नगरपरिषद अन्यायग्रस्त कंत्राटी कामगारांना सिद्धिविनायक पतसंस्थेतर्फे दिवाळी भेट



औसा । बी.डी. उबाळे

औसा नगर परिषदेच्या ७१ कंत्राटी स्वच्छता कामगारांना नगरपरिषदेचे प्रशासन आणि कौन्सिलच्या हलगर्जीपणामुळे तीन महिन्यापासून कामावरून काढून टाकल्यामुळे कंत्राटी स्वच्छता कामगारांची उपासमार होत आहे ही बाब लक्षात घेऊन सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन श्रीशैल उटगे यांच्या संकल्पनेतून अन्यायग्रस्त स्वच्छता कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून दिवाळीच्या सणाचा शिधा असलेले किट भेट म्हणून देण्यात आले.

यावेळी बोलताना पतसंस्थेच्या चेअरमन जयश्री उटगे म्हणाल्या की कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी आगामी काळात आम्ही निश्चित प्रयत्न करू पतसंस्थेच्या वतीने मानवतेच्या भावनेतून आम्ही मनापासून दिलेली दिवाळीची भेट ही आपल्या जीवनात आनंद निर्माण करणारी ठरव अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी पतसंस्थेच्या चेअरमन, उदगीर व्हाईस चेअरमन मुजावर संचालक पवन कांबळे औसा विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन शिंदे व्हाईस चेअरमन तथा पतसंस्थेचे संचालक शेख, व्यवस्थापक प्रमोद शिंदे, कंत्राटी कामगार संघटनेचे अध्यक्ष नेताजी बनसोडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. ७१ कंत्राटी स्वच्छता कामगारांना सिद्धिविनायक नागरी पतसंस्थेच्या वतीने सणासुदीच्या काळात केलेल्या मदतीचे कर्मचारी वर्गातून कौतुक होत आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी महायुती निवडणूक मैदानात

लातूर जिल्हा बँकेवर झेंडा फडकविण्यासाठी महायुतीचे नेते एकवटले

लातूर । प्रतिनिधी

शेतकऱ्याच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि उन्नतीसाठी स्थापन केलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या प्रगतीऐवजी देशमुख कुटुंबांनी स्वतःच्या उद्योग व्यवसायासाठी कोट्यावधी रुपयाची कर्ज घेऊन शेतकऱ्याची फसवणूक केली बँकेत परिवर्तन व्हावे शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक व्हावी यासाठी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून महायुती निवडणुकीच्या रिंगणात उतरली असून जिल्हा बँकेवर महायुतीचा झेंडा फडकनार असा विश्वास व्यक्त करून शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही बांधील राहू अशी ग्वाही जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या वतीने ८ नोव्हेंबर रविवार रोजी दुपारी आ. रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील भाजपा संवाद कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेस भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. बसवराज पाटील, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. संजय बनसोडे, आ. रमेशआप्पा कराड, माजी मंत्री विनायकराव पाटील, अँड. बळवंतराव जाधव, गणेशदादा हाके, बब्रुवान खंदाडे, त्र्यंबकआबा गुट्टे, संतोष सोमवंशी, दिलीपराव देशमुख, अशोककाका केंद्रे, विक्रमकाका शिंदे, उमेदवार ऋषिकेश कराड, गिरीश पाटील, शरद शिंदे यांच्यासह महायुतीतील भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट), शिवसेना (शिंदे गट) या तिन्ही पक्षातील अनेकांची उपस्थिती होती.



महायुतीची मजबुतीने लढत

सहकार चळवळ मजबूत व्हावी लोकाभिमुख व्हावी यासाठी देशात अमितजी शहा आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री सुनित्रा पवार यांच्या नेतृत्वातील महायुती शासनाने महत्वपूर्ण निर्णय घेऊन सहकाराविषयी अतिशय चांगले धोरण राबवत आहेत असे सांगून यावेळी बोलताना आ. बसवराज पाटील म्हणाले की, लातूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून महायुतीचे सर्व नेते एकत्रितपणे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनलच्या माध्यमातून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. परिवर्तन पॅनल ला कपबशी हे चिन्ह मिळाले असून या पॅनलला सरकारचा पाठिंबा आहे. पॅनलच्या माध्यमातून सक्षम आणि अनुभवी उमेदवार देण्यात आले आहेत पॅनलच्या पाठीशी जनाधार आहे. ही निवडणूक चांगल्या पद्धतीने जिंकून महायुतीचा झेंडा फडकवू आणि मतदाराच्या अपेक्षा निश्चित पूर्णपणे करू असा विश्वास व्यक्त केला.

प्रदूषण होणारे फटाके बंद करा

शेतकऱ्याच्या देठालाही हात लागला तर हात कलम केले जातील असे छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण होते याच धोरणाला अनुसरून शेतकऱ्यांच्या पाठीशी मजबुतीने उभे राहिले पाहिजे या भूमिकेतून शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून महायुतीच्या पॅनलला रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज परिवर्तन पॅनल असे नाव देण्यात आले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व्यक्तिगत आणि परिवार म्हणून काँग्रेस सोबत असल्याचे सांगून आ. संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, सत्ताधाऱ्यांचा कामावर विश्वास असता तर कोणाच्याही अर्जावर आक्षेप घेतला नसता, निवडणुका होऊ दिल्या असत्या, रात्रीतून इच्छुकांना उचलून नेले नसते, घोडेबाजार केला नसता. खऱ्या अर्थाने हा लोकशाहीचा खून आहे. बँकेच्या निवडणुकीत शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बँकेच्या कारभारावर बोलणे अपेक्षित असताना सत्ताधाऱ्याकडून व्यक्तिगत टीका टिपणी करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहेत प्रदूषण होणारे फटाके वाजविणे बंद करा असे आवाहन केले.

विजयासाठी राष्ट्रवादी प्रयत्न करणार

महायुतीचा धर्म म्हणून मागील काळात झालेल्या सर्व निवडणुकीत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट), शिवसेना (शिंदे गट) आम्ही सर्वांनी एक दिलाने एक ताकतीने सामोरे गेलो. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मी स्वतः आणि आ. विक्रम काळे, प्रदेश प्रवक्ते सुरज चव्हाण जिल्हाभर फिरून महायुतीच्या विजयासाठी प्रयत्न करणार आहोत असे सांगून आ. संजय बनसोडे म्हणाले की, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज पॅनलच्या माध्यमातून सक्षम उमेदवार दिल्याने जिल्हा बँक महायुतीच्या ताब्यात येणार यात शंका नाही.

शेतकऱ्यांना नव्हे एका कुटुंबाला आर्थिक स्थैर्य

जिल्हा बँक शेतकऱ्यासाठी नव्हे तर लिमिटेड कंपनीसाठी काम करीत आहे. गेल्या पंचवीस वर्षात शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळाले नाही तर केवळ एकाच कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळाले असल्याची टीका करून आ. रमेश आप्पा कराड म्हणाले की, बिनव्याजी पाच लाखाचे कर्ज किती जणाला दिले जाहीर करावे असे आव्हान करून देश एग्रोला महिनाभराच्या आतच कोट्यावधीचे कर्ज देऊन तत्परता दाखवणाऱ्या जिल्हा बँकेतून शेतकऱ्यांना तत्परतेने का कर्ज दिले जात नाही. ३० - ४० वर्षानंतरही मांजरा कारखाना कर्जबाजारी कसा आहे? असा प्रश्न उपस्थित करून लातूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदार महायुतीच्या बाजूने आहेत निश्चितपणे महायुतीची सत्ता येणार असे बोलून दाखवले.

लातूर जिल्हा बँकेने महाराष्ट्रात सर्वात चांगले काम केले असेल तर पळून का जाता निवडणुकीला का घाबरता? किती दिवस पडणार ज्या दिवशी जनतेत याल त्या दिवशी जनता हिसाब केल्याशिवाय राहणार नाही असे सांगून यावेळी बोलताना विनायकराव पाटील म्हणाले की, सहकार मंत्र्यांनी कधी आणि कुठला युतीचा धर्म पाळला असा प्रश्न उपस्थित करून जिल्हा बँकेच्या निवडणुकीनंतर महायुतीचा चेअरमन होणार असे बोलून दाखविले. पत्रकार परिषदेस उपस्थित पत्रकारांचे चंद्रकांत कातळे यांनी आभार व्यक्त केले. या पत्रकार परिषदेस मपहायुतीचे नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — सोमवार दि.०९ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या जिल्हाध्यक्षपदासाठी सर्वांच्या नजरा

कळमनुरीत । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला गेल्या काही काळात मोठा धक्का बसला असून, पक्षातील अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसह माजी आमदार आणि जिल्हाप्रमुख यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने तालुक्यातील पक्षाची संघटनात्मक ताकद काहीशी कमकुवत झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेने कळमनुरी येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक घेत संघटनात्मक परिस्थितीचा आढावा घेतला. आगामी काळात पक्षाची नव्याने बांधणी करून कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर बैठकीत भर देण्यात आल्याची चर्चा आहे. दरम्यान, पक्षातील जिल्हाध्यक्षपद रिक्त झाल्याने आता या पदावर कोणाची वर्णी लागणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जिल्हाध्यक्षपदासाठी इच्छुक पदाधिकाऱ्यांमध्ये चढाओढ सुरू झाली असून, वरिष्ठ नेतृत्व कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब करते, याची उत्सुकता कार्यकर्त्यांमध्ये आहे.

एकीकडे पक्षाला सोडचिठ्ठी देणाऱ्या नेत्यांमुळे संघटनेसमोर आव्हान उभे राहिले असताना, दुसरीकडे नव्या जिल्हाध्यक्षाच्या माध्यमातून पक्षाला नवसंजीवनी देण्याची अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे आगामी काळात जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी कोणाच्या खांद्यावर सोपवली जाते आणि कळमनुरीसह हिंगोली जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक घडी पुन्हा कशी बसवली जाते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दुष्काळाची दाहकता वाढली; पैनगंगा नदी कोरडी, जमिनीत ओलावाच नसल्याने रब्बी हंगामाचा पेरा घटला!

हिमायतनगर । धम्मपाल मुनेश्वर

मौसमी पावसाच्या अखंड उघडीपीमुळे खरिपाचा हंगाम अतिशय नुकसानीत जात आहे. हाती आलेल्या उत्पादनात विक्रमी पद्धतीने घट निर्माण झाली असल्याने शेतकरी मोठ्या अर्थिक अडचनीत सापडला आहे. नगदी पीक सोयाबीनचे न भरून निघण्यासारखे नुकसान झाले आहे. कपाशीची वेचनीही सुरू आहे. कपाशी तर अशी नुकसानीत आली आहे की, टाकलेला खर्च ही निघने मुश्किल झाले आहे. शासनाकडून शेतकर्याना भरिव स्वरूपाच्या मदतीची अपेक्षा होती. परंतू शासनाने शेतकर्याच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

तालूक्याच्या सिमारेषेवरून वाहणारी पैनगंगा आताच कोरडी पडली आहे. फार पुर्वी म्हणण्यापेक्षा चारपाच वर्षापुर्वी ही पैनगंगा नदी बारमाही वाहण्याची. या वर्षी मात्र अत्यल्प पावसामुळे ऑक्टोंबरच्या मध्यंतरातच पेनगंगा नदीचे पात्र कोरडे पडले आहे. अवर्षणांमुळे दुष्काळ निर्माण झाला आहे. पूर्वी मौसमी पावसाचे प्रमाण अतिशय चांगल्याप्रकारे असायचे एक तर खरीप हंगाम हातचा गेला तर रब्बी हंगामावर त्याची भरपाई व्हयायची.या वर्षी तर ही आशाही मावळली आहे. पावसाअभावी खरीप हंगाम हातचा गेला आहे. खरीप नुकसानीत गेला आणि आता रब्बी ची पेरणी करावी तर जमिनीत ओलावाच राहीला नाही. मग रब्बी पिकांची पेरणी कशी करावी? असा प्रश्न आता शेतकर्याना पडलेला आहे. आशा परतीच्या पावसाची होती. परंतू दुरदैवाने परतीचा पाऊस ही निराशा करूण जात आहे.

ऑक्टोंबर हिट असा जाणवत आहे की, उन्हाच्या दाहकतेने खरिपाच्या पिकांची



अवस्था अतिशय नाजूक बनली आहे. ओढ्या नाल्यात पाणीच शिल्लक राहीलेले नाही. आहे त्या ठिकाणच्या नैसर्गिक पाण्याचे वेगाने बाष्पीभवन झाले असल्याने जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय राहीली नाही. जनावरांना एवढा पावसाळा गेला परंतू नैसर्गिक रित्या पिण्यासाठी पाणिच उपलब्ध झाले नाही. कृत्रिम कुपनलिकेच्या पाण्यावर जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी लागत आहे. वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तर अतिशय गंभीर स्वरूपाचा बनला आहे. संभाव्य पाणि टंचाई, चारा टंचाई लक्षात घेवून अनेक पशू पालक हे आपली जनावरे विक्रीसाठी बाजारात नेत आहेत. परंतू तिथेही शेतकर्याना निराशेचा सामना करावा लागत आहे.

बेभाव जनावरे विक्री करण्याची वेळ शेतकर्यावर आली आहे. शासनांकडून घोषना होतात. योजना आखल्या जातात. परंतू कृतीत उतरायला अनेक दिवसाचा अवधी निघून जातो. परंतू पदरात काही पडत नाही. असा आजवरचा अनूभव शेतकर्याना आलेला आहे. नाईलाजास्तव पशूधन बेभाव विक्री करण्याची वेळ शेतकर्यावर आली आहे. सध्या या भागात दोन, तिन दिवसांचा खंड सोडला तर प्रचंड प्रमाणात उन्हं तापत आहे. उन्हाच्या दाहकतेबरोबर दुष्काळाची दाहकता वाढली आहे. पाणि टंचाई व संभाव्य दुष्काळावरची उपाय योजना आखण्यात शासनाकडून प्रयत्न होत आहेत.

दिवाळी अगदी जवळ येवून ठेपलेली आहे. दिवाळीचा सन कसा साजरा करायचा हा मोठा प्रश्न शेतकरी व सर्व सामान्यांसमोर उभा ठाकलेला आहे. शेतकरी, शेतमजूर हलालदिल झाला असून शासनाने शेतकर्याना अर्थिक मदत जाहीर केली आहे. ती मदत आज ना उद्या पदरात पडेल. परंतू शेतकर्याबरोबर सर्व सामान्य नागरीकांना, विशेषता शेतमजूरांनाही शासनाकडून तुर्तास मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तुर्तास इसापूर प्रकल्पातून पैनगंगेला पाणि सोडण्यात येवून प्राणीमात्रांसह वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जलदगतीने सोडवावा, अशी मागणी नागरीकांकडून केली जात आहे.

पाणी द्या, मगच घरपट्टी घ्या!

आखाडा बाळापूरमध्ये भीषण पाणीटंचाई; नागरिकांचा ग्रामपंचायतीला थेट इशारा

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत आहे. महिलांसह वृद्ध व लहान मुलांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागत असताना ग्रामपंचायतीकडून मात्र घरपट्टी वसुलीचा तगादा सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गावात तब्बल पाच ते आठ दिवसांनंतर एकदा पाणीपुरवठा होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. पाण्याअभावी नागरिकांचे हाल होत असताना घरपट्टी वसुली सुरू ठेवणे म्हणजे 'पाणी नाही, पण कर वसुली मात्र सुरू' अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



या गंभीर प्रश्नाकडे ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देऊन पाणीटंचाईच्या काळात घरपट्टी वसुली थांबवावी, नागरिकांना दररोज अथवा एक दिवसाआड मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे, गावातील बंद असलेले हातपंप तातडीने दुरुस्त करावेत, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक जाहीर करावे तसेच टँकर द्वारे पाणीपुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांना मूलभूत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना कर वसुलीसाठी मात्र तत्परता का? असा सवाल निवेदनाद्वारे उपस्थित करण्यात आला आहे.

पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात. नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नये; अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. हे निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा उपसंघटक सोपान पाटील बोंडारे यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे दिले आहे.

शेतकऱ्यांच्या कष्टाला मिळाला मानाचा मुजरा! आमदार श्रीजया चव्हाण यांची दिवाळी शेतकरी कुटुंबासोबत

जवळा पाटक येथे शेतकरी कुटुंबातील आठ नवनियुक्त पोलीस कर्मचाऱ्यांचा घरी जाऊन गौरव; ग्रामीण गुणवत्तेचा केला सन्मान

मुदखेड । प्रतिनिधी

दिवाळी म्हटली की आनंद, उत्साह आणि आप्तस्वकीयांच्या भेटीगाठींचा सण! मात्र, यंदाच्या दिवाळीत आमदार श्रीजया चव्हाण यांनी राजकीय व्यासपीठापेक्षा ग्रामीण भागातील कर्तृत्वाचा सन्मान करण्याला प्राधान्य देत एक वेगळा आदर्श निर्माण केला. जवळा पाटक येथील शेतकरी विलासराव भोकरे व संदीप भोकरे यांच्या कुटुंबातील पोलीस भरतीत यश संपादन केलेल्या आठ नवनियुक्त पोलीस कर्मचाऱ्यांचा त्यांच्या घरी जाऊन सन्मान करण्यात आला.



शेतकरी कुटुंबातील मुलांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पोलीस भरतीत मिळवलेले यश ही संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. शेतीच्या मातीत घाम गाळत मुलांचे भविष्य घडविणाऱ्या या कुटुंबाच्या आनंदात सहभागी होत आमदार श्रीजया चव्हाण यांनी दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील युवकांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले यश इतर युवकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेत आमदारांनी दिवाळीच्या मुहूर्तावर थेट घरी भेट देऊन त्यांचा गौरव केला. राजकीय भेटीगाठींपलीकडे जाऊन ग्रामीण गुणवत्तेचा सन्मान करणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. यावेळी भा.च.स.सा.का. चेअरमन नरेंद्र चव्हाण, गोविंदराव नागेलीकर, मारोतराव जाधव, उत्तमराव लोमटे, दत्ता पाटील कोकाटे, दिलीपराव कोरे, लक्ष्मणराव जाधव, नामदेव बिचेवार, केशव मुंगल, संदीप भोक्रे, रमेश लखे, नवनाथ कदम आदींसह शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कत्तलीसाठी गोवंशीय जनावरांची अवैधरित्या वाहतूक करणारा कंटेनर पकडला

४८ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त करून दोघांवर गुन्हा दाखल; मनाठा पोलीस ठाणे यांची कारवाई

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यात गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पोलीस ठाणे मनाठा येथील पोलीस पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून हदगाव ते वारंगा रोडवर गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी अवैध वाहतूक करणाऱ्या एका कंटेनरवर धडक कारवाई केली आहे. या कारवाईत ७९ गोवंशीय बैल जातीची आणि अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर असा एकूण ४८,१२,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, उत्तर प्रदेशातील दोन आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दिनांक ०६/११/२०२६ रोजी मनाठा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक / राष्ट्रपाल लोखंडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, हदगाव ते वारंगा जाणाऱ्या रोडने एका अशोक लेलँड कंपनीच्या कंटेनरमधून (क्र. छड-०१/-घ-७३७९) गोवंशीय जनावरांची विनापरवाना आणि बेकायदेशीररीत्या वाहतूक होत आहे.



सदर माहितीच्या अनुषंगाने सपोनि लोखंडे यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक / सुदर्शन इंगोले व त्यांचे पथक हदगाव ते वारंगा रोडवरील मौजे मनाठा पाटी येथे वाहनांची तपासणी करत असताना संशयित अशोक लेलँड कंटेनर हदगावकडून वारंगा फाट्याच्या दिशेने येताना दिसला. पोलिसांनी इशारा देऊन सदर वाहन रस्त्याच्या बाजूला थांबवले. कंटेनरची पाहणी केली असता, त्यामध्ये गोवंशीय बैल जातीच्या जनावरांना अत्यंत क्रूर व निर्दयीपणे, पायास दोरीने बांधून, वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त दाटीवाटीने भरलेले आढळून आले. जनावरांच्या आरोग्याची व सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता त्यांना उपाशीपोटी ठेवून, अमरपाटन (जि. मैहर, राज्य मध्य प्रदेश) येथून हैदराबाद येथे कत्तलीसाठी नेले जात असल्याचे निष्पन्न झाले. चालकाकडे जनावरांचा दाखला व वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे त्यांनी सांगितले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे व पत्ता १) मोहम्मद बिलाल अजिज (वय ३० वर्षे, व्यवसाय चालक, रा. लालबाग कानेटा रोड, वार्ड क्र. १७, हसनपूर, ता. हसनपूर, जि. अमरोहा, उत्तर प्रदेश) २) मोबीन अहेमद मोहम्मद इसरार (वय ३४ वर्षे, व्यवसाय क्लिनर/किन्नर, रा. आझाद नगर करारी, ता. मंझनपूर, जि. कौशांबी, उत्तर प्रदेश) अशी आहेत. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करून १) एक जुना वापरता अशोक लीलँड कंपनीचा कंटेनर (पासिंग क्रमांक: छड-०१/-घ-७३७९) अंदाजे किंमत ३०,००,०००/- रुपये. २) गोवंशीय जनावरे एकूण ७९ बैल अंदाजे किंमत १८,१२,०००/- असा एकुण ४८,१२,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी वरील नमुद आरोपीविरुध्द पोलीस ठाणे मनाठा गुरं क्र. २०७/२०२६ कलम ११(१)(व), ११(१)(श) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, कलम ५ अ (१), ५(२), ९, ११ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सह कलम ६६, १९२ मोटार वाहन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर उल्लेखनीय कारवाई, डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशाने मनाठा पोलीस ठाण्याचे सपोनि/ राष्ट्रपाल लोखंडे, पोउपनि/सुदर्शन इंगोले पोलीस अंमलदार रेणुप्रसाद भोपाळकर, रामराव राठोड, शंकर सोनटक्के आणि अतुल नागरगोजे यांच्या पथकाने केली आहे. गोवंशाची अवैध वाहतूक, प्राण्यांवर क्रूरता किंवा कत्तलीसाठी संशयास्पद पद्धतीने जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती द्यावी.

गणपती महाविद्यालयात OJT प्रशिक्षणाची यशस्वी सांगता; विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास दुणावला

कुंडलवाडी । प्रतिनिधी

बिलोली येथील गणपती कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले OJT (On Job Training) प्रशिक्षण उत्साहात संपन्न झाले. समारोप प्रसंगी प्रमाणपत्र वितरण व निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील कामकाजाचा अनुभव, व्यावहारिक ज्ञान आणि रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध कौशल्यांचे ज्ञान प्राप्त केले. समारंभात संस्थेचे अध्यक्ष डॉ.पी.जी.रामपुरे सर यांच्या हस्ते सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. शिक्षणाला व्यावहारिक अनुभवाची जोड दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. हा उपक्रम प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. प्रताप गणपतराव रामपुरे व सचिव कमल जाधव यांच्या प्रेरणेने, तर प्र. प्राचार्य कबीर देवकरे यांच्या नियोजनानुसार यशस्वी झाला.

जगद समन्वयक प्रा.रामपुरे जी.पी.यांनी उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. रामपुरे व्ही.पी. यांनीही प्रशिक्षण केंद्रांना वेळोवेळी भेटी देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. यावेळी न्यू बाईट्स कॉम्प्युटर, बिलोलीचे संचालक समीर सर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

OJT मुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, कार्यक्षमता, शिस्त व जबाबदारीची भावना विकसित झाली. भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी हे प्रशिक्षण निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कुंडलवाडीत दिवाळीनिमित्त बाजारपेठ फुलली, नागरिकांची प्रचंड गर्दी

कुंडलवाडी । प्रतिनिधी

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठ फुलून गेली आहे.बाजारात नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ दिसून येत असून सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पसरले चित्र दिसायला मिळत आहे. दिवाळीच्या आगमनाने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने रंगवून, आकर्षक सजावट व रोषणाई केली आहे. कपडे, पूजेचे साहित्य, मिठाई, फटाके, किराणा, भाजीपाला, फुले आदी खरेदीसाठी नागरिकांनी बाजारात गर्दी होत असल्यांचे चित्र दिसायला केली आहे. त्यामुळे बाजारपेठेत नागरिकांची मिळते.

भारतीय संस्कृतीत दीपावली सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुंडलवाडी शहर व परिसरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा दुष्काळसदृश्य परिस्थिती असतांना सूद्धा नैराश्यातून बाहेर पडत शेतकरी, व्यापारी तसेच सामान्य नागरिक शुक्रवार आठवडी बाजारानिमित्त पूजेचे साहित्य, किराणा, भाजीपाला, फुले आदी आवश्यक साहित्य खरेदी करत होते. त्यामुळे बाजारपेठेत नागरिकांची एकच गर्दी दिसून येत होती.

चंद्रकांत शिंदे कुटुंबाच्या मदतीसाठी प्रशासन सरसावले; मुलांना दरमहा ५ हजार, वृद्ध आईला १,५०० रुपयांचे अर्थसाहाय्य

मुदखेड । प्रतिनिधी

नांदेड येथील एका मायक्रोफायनान्स कंपनीच्या कार्यालयात मृतदेह आढळलेल्या तालुक्यातील माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या कुटुंबीयांची माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी ७ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन सांत्वन केले. या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचीही उपस्थिती होती. या दुर्दैवी घटनेनंतर निराधार झालेल्या शिंदे कुटुंबाला नियमित व शाश्वत आर्थिक आधार लाभावा, यासाठी प्रशासकीय पातळीवर तातडीने महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.



चंद्रकांत शिंदे कुटुंबातील एकमेव कमावते व्यक्ती होते. त्यांच्या निधनामुळे कुटुंबासमोर निर्माण झालेली अडचण लक्षात घेऊन त्यांच्या दोन्ही लहान मुलांना वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रत्येकी दरमहा २,५०० रूपयांचे शासकीय आर्थिक साहाय्य दिले जाणार आहे. तसेच त्यांच्या वृद्ध आईला जीवन जगण्यासाठी आधार मिळावा म्हणून 'श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजने'तून दरमहा १,५०० रूपयांची पेन्शन मंजूर करण्यात आली आहे. या नियमित मासिक आर्थिक मदतीमुळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळणार आहे.

याव्यतिरिक्त मुलांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करून, कुटुंबीयांची संमती असल्यास दोन्ही मुलांच्या दर्जेदार शिक्षणाची, पुण्यात वसतिगृह व भोजनाची संपूर्ण मोफत व्यवस्था करण्याचा प्रस्तावही यावेळी खा. अशोकराव चव्हाण यांच्या वतीने कुटुंबासमोर ठेवण्यात आला. या सर्व शासकीय योजनांचा लाभ कुटुंबाला विनाविलंब सुरू व्हावा, यासाठी आवश्यक ती प्रशासकीय प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी जिल्हा प्रशासनाला देण्यात आले. यावेळी भोकर येथील अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, भाजपा तालुका अध्यक्ष दत्तू देशमुख वाडीकर सह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

वारंगा फाटा परिसरातून २० हजारांची मोटारसायकल लंपास

कळमनुरीत । प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा परिसरातून अज्ञात चोरट्याने सुमारे २० हजार रुपये किमतीची मोटारसायकल लंपास केल्याची घटना ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तोंडापूर येथील संदीप सुभाष थोरात हे व्यवसायाने वाजंत्री असून, ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास वारंगा फाटा येथील वारंगा गावाकडे जाणाऱ्या रोडवर त्यांची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्रो मोटारसायकल उभी होती. मोटारसायकलचा क्रमांक एमएच २६ एएल ३५८९ असा आहे. दरम्यान, काही वेळाने अज्ञात इसमाने मोटारसायकल चोरून नेल्याचे निदर्शनास आले. मोटारसायकलची अंदाजे किंमत २० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी ८ नोव्हेंबर रोजी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, गुन्हा नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास जमादार बालाजी जोगदंड करीत आहेत.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इलासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

page 6_Layout 1 11/8/2026 11:28 PM Page 1

ना.पंकजाताई मुंडेंची यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांसोबत

दुष्काळ, ऊसतोड कामगारांचे दु:ख आणि तरुण ऊसतोड कामगाराच्या अपघाती मृत्यूने मन हेलावले

बीड/प्रतिनिधी

सध्याची दुष्काळी परिस्थिती ऊसतोड कामगारांचे दु:ख आणि ऐन दिवाळीत सकाळी सकाळी मतदारसंघातील ऊसतोड तरुणाच्या अपघाती मृत्यूची आलेली बातमी ऐकून आपण व्यथित झालो. यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार आणि शेतकऱ्यांसोबत साजरी करत त्यांचे कष्ट वाटून घेण्याचा मनोदय राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला आहेत.

ना. पंकजाताई मुंडे यांनी समाज माध्यमावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या म्हणाल्या, माझ्या मतदारसंघातील एका २२ वर्षीय तरुणाचा ऊसतोडणीसाठी गेलेला असताना अपघाती मृत्यू झाल्याची बातमी सकाळी सहा वाजता मिळाली आणि या घटनेने मन सुन्न झाले. त्या तरुणाच्या आयुष्यात कितीतरी स्वप्ने होती, त्याच्या कुटुंबाला त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, एका अपघाताने सारे काही हिरावून घेतले.

या घटनेने ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांचे दु:ख आणि त्यांच्यासमोरील संघर्ष पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवला. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अगोदरच मन उदास आहे. त्यातच मन सुन्न करणारी ही घटना ऐन दिवाळीच्या काळात कानावर आली. तसं तर मुंडे साहेब गेल्यापासून संकटावर संकटे येतात, जातात... आता संकटांची सवय झाली असली तरी दुष्काळ आणि ऊसतोड कामगारांचा संघर्ष याने मात्र मन अधिकच उदास बनले आहे.मुंडे साहेब केल्यापासून खऱ्या अर्थाने दिवाळी सण उत्सव स्वरूपात आपण कधी केलाच नाही दरवर्षी अनाथ मुलांसोबत आपण दिवाळी साजरी करतो. प्रत्येकाच्या वाट्याला वैभव आणि ऐश्वर्य येतेच असे नाही. मात्र, प्रत्येकालाच सुखाने जगण्याचा अधिकार आहे. माझा जन्म मुंडे साहेबांच्या पोटी झाला, हे माझे भाग्य आहे. पुन्हा जन्माची निवड करण्याची संधी मिळाली तरी मी त्यांच्याच पोटी जन्म घेण्याची इच्छा व्यक्त करेन; पण आजूबाजूला असणाऱ्या कष्टकरी कुटुंबांचे दु:ख पाहून मनाला चैन पडत नाही, असे त्या म्हणाल्या.
























दीपावली च्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — सोमवार दि.०९ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.७

प्रा.डॉ. रावसाहेब ढवळे यांचा योगदानाबद्दल जाहीर सन्मान

जालना । प्रतिनिधी

जालना ज्येष्ठ नागरिक मंचचे संस्थापक - सचिव आणि विद्यमान कार्याध्यक्ष प्रा डॉ रावसाहेब ढवळे यांचा विविध क्षेत्रात भरीव योगदानाबद्दल नुकताच एका कार्यक्रमात जाहीर सन्मान करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ जालना, एचडीएफसी बँक, डिएस मिल्स आणि एका प्रतिष्ठित दैनिकातर्फे येथील रुक्मिणी गार्डनमध्ये आयोजीत ... क्या जमाना था या अनोख्या कार्यक्रमात एचडीएफसी बँकचे वरिष्ठ अधिकारी व्यंकटेश कोजलगी आणि रोटरीचे



अध्यक्ष प्रशांत महाजन यांच्याहस्ते शिक्षण - साहित्य - पत्रकारिता आणि सामाजिक - सांस्कृतिक क्षेत्रात भरीव योगदानाबद्दल प्रा डॉ ढवळे यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

खास ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी आयोजित या कार्यक्रमात संगीत मैफिलीसोबतच उपस्थित महिला व पुरुषांसाठी विविध प्रकारचे मनोरंजक खेळ घेतल्याने अधिक रंगत आली. प्रख्यात जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक डॉ जुगलकिशोर भाला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुरेश कुलकर्णी - केसापूरकर यांनी तर आभार प्रदर्शन रोटरीचे प्रशांत महाजन यांनी केले.

गावठी कट्टा बाळगणारा सराईत आरोपी बुलेटसह गजाआड

दिवाळीच्या पूर्वसंध्येला चंदनझिरा पोलिसांची धडक कारवाई; १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त; चंदनझिरा पोलिसांची धडक कामगिरी

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जालना पोलिसांनी अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध धडक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत चंदनझिरा पोलिसांनी पूर्वसंध्येला कारवाई करत गावठी कट्टा व बुलेट वाहनासह एका सराईत आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आकाश रमेश गायकवाड (वय २८ वर्ष, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

नेमकी घटना काय?

दिनांक ७ नोव्हेंबर रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पथक सुंदरनगर परिसरात पेट्रॉलिंग करत असताना, गुप्त बातमीदाराद्वारे बातमी मिळाली की, आरोपी आकाश गायकवाड हा कमरेला गावठी कट्टा बाळगून बुलेट मोटरसायकलवर फिरून परिसरात दहशत निर्माण करत आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक श्री. किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने दोन पंचांसमक्ष सुंदरनगर येथील वैशाली किराणा स्टोअरच्या पाठीमागील गल्लीत सापळा रचून कारवाई केली. संशयित आरोपी बुलेटवरून (क्र. MH-21-CE-5302) येताना दिसताच त्यास थांबवून त्याची अंगझडती घेण्यात आली. यावेळी त्याच्याकडे ४०,००० रुपये किमतीचा मॅगझिनसह गावठी कट्टा आणि १,००,००० रुपये किमतीची बुलेट मोटरसायकल असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

आरोपी अभिलेखावरील गुन्हेगार

अटक करण्यात आलेला आरोपी आकाश गायकवाड हा पोलिसांच्या अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून, यापूर्वीही त्याच्याविरुद्ध लुटमार, मारहाण व भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

शांतता व सुव्यवस्थेसाठी पोलीस सतर्क!

सणासुदीच्या काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली जात आहे. अशा प्रवृत्तींना थारा दिला जाणार नाही, असा इशारा पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी दिला आहे.

सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक सय्यद अफसर सय्यद हुसैन, पोहेकॉ सुभाष पवार, प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, राजेंद्र पवार, संतोष वनवे, शरद पवार व सागर खैरे यांच्या पथकाने केली.



१० नोव्हेंबरपर्यंत जायकवाडीच्या डाव्या कालव्यातून पाणी सोडणार; राजेश टोपे यांच्या पाहणीनंतर अधिकाऱ्यांची ग्वाही

अंबड । प्रतिनिधी

जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून ५ नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला होता. मात्र, इंदेगाव येथे कालव्यावर सुरू असलेल्या पुलाच्या बांधकामामुळे पाणी सोडण्यास विलंब होत असल्याचे समोर आले. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी ३ नोव्हेंबर रोजी इंदेगाव येथे प्रत्यक्ष भेट देऊन पुलाच्या बांधकामाची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकारी, अभियंते आणि कंत्राटदारांशी चर्चा करून १० नोव्हेंबरपर्यंत डाव्या कालव्यातून पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांनीही १० नोव्हेंबरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत



पाणी सोडण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

२ नोव्हेंबर रोजी झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ५ नोव्हेंबर ही पाणी सोडण्याची तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र, इंदेगाव येथील पुलाच्या बांधकामामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींची माहिती वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित मंत्री महोदयांना देणे तसेच ही बाब समितीसमोर मांडणे अपेक्षित होते. मात्र, तसे न झाल्याने पाणी सोडण्याच्या नियोजनात अडचणी निर्माण झाल्याचे टोपे यांनी निदर्शनास आणून दिले.

सध्या मराठवाड्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती असून डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील सर्व जिल्ह्यांतील शेतकरी, नागरिक आणि पशुधन पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. अशा परिस्थितीत एका पुलाच्या बांधकामामुळे संपूर्ण मराठवाड्याला वेठीस धरणे योग्य नसल्याचे टोपे यांनी स्पष्ट केले. पुलाचे बांधकाम आणि कालव्यातून पाणी सोडण्याचे नियोजन यामध्ये समन्वय साधणे आवश्यक होते, असेही त्यांनी सांगितले.

पाहणीदरम्यान टोपे यांनी कंत्राटदार, अभियंते व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून सुरू असलेले बांधकाम आहे त्या स्थितीत ठेवून तातडीने पाणी सोडण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली. त्यानुसार पाणी सोडण्याचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेला शब्द पाळून १० नोव्हेंबरपर्यंत डाव्या कालव्यातून पाणी सोडावे. दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील शेतकरी, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा राजेश टोपे यांनी व्यक्त केली.

कुंभार पिंपळगाव येथे फटाक्याच्या दुकानाला अचानक आग; नागरिकांच्या धाडसामुळे टळली मोठी जीवितहानी

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथील गाव फाटा रस्त्यावर असलेल्या एका फटाक्याच्या दुकानाला अचानक आग लागल्याची घटना घडली. दुकानात अचानक आग भडकल्याने आणि फटाके जोरात फुटू लागल्याने परिसरात काही काळ एकच गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या भीषण प्रसंगी परिसरातील जागरूक नागरिकांनी आणि तरुणांनी दाखवलेल्या अफाट धाडसा व समयसूचकेमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

प्राप्त माहितीनुसार, कुंभार पिंपळगाव येथील गाव फाटा रस्त्यावरील एका फटाक्याच्या दुकानाला कोणत्याही पूर्वकल्पनेविना अचानक आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच दुकानात असलेले फटाके एकापाठोपाठ एक



वेगाने फुटू लागल्याने मोठा आवाज होऊ लागला आणि परिसरात आरडाओरडा व धावपळ सुरू झाली. फटाक्यांच्या ट आवाजामुळे नागरिक भयभीत झाले होते.

अशा या अत्यंत धोकादायक आणि आपत्कालीन परिस्थितीतही न घाबरता परिसरातील धाडसी नागरिकांनी आणि तरुणांनी तातडीने पुढे येत स्वतःचा जीव धोक्यात घालून आग विझवण्यासाठी अथक प्रयत्न केले. नागरिकांच्या या सतर्कतेमुळे आणि तातडीच्या उपाययोजनांमुळे आग अधिक पसरण्यापूर्वीच आटोक्यात आणण्यात यश आले. स्थानिक नागरिकांच्या या समयसूचक मदतीमुळे एक मोठी दुर्घटना टळली असून, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. ऐन सणासुदीच्या किंवा गर्दीच्या काळात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात काही वेळ तणावाचे वातावरण होते, परंतु नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे मोठे नुकसान टळल्याने सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

परतूरमध्ये 'मराठवाडा दूत' दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन

देसाई परिवाराच्या उपस्थितीत झाले प्रकाशन

परतूर । पिराजी गायकवाड

ज्या दिवाळी अंकाची 'दर्दी' वाचक मोठया उत्सुकतेने वाट पाहतात त्या मराठवाडा दूत दिवाळी अंकाचे प्रकाशन शनिवारी (दि. ७) उत्साहात पार पडले. यावेळी लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे, ग्रामीण कथाकर छबुराव भांडवलकर, कल्याणराव बागल पाटील, अभय काळुंके, पत्रकार बालाजी ढोबळे,विठ्ठलराव सोनवणे, लंका भवर, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा सोनवणे यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या या कार्यक्रमाला देसाई परिवारातील सदस्य आवर्जून उपस्थित होते हे विशेष.

यावेळी बोलताना डॉ. दिरंगे म्हणाले की, दिवाळीच्या दिवसात जसा आपण फराळीचा आस्वाद घेतो तसा दिवाळी



अंकाचा घ्यायला हवा. दिवाळी अंकात विविध लेखक, कवी, चारोळीकार यांचे लेखन वाचायला मिळते. वाचनातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. विविध क्षेत्रातील माहितीचे आकलन होते. दरवर्षी प्रकाशित होणारे दिवाळी अंक म्हणजे एक मेजवानीच असते. लेखक भांडवलकर म्हणाले की, अजय देसाई यांच्या अंगी एका चांगल्या लेखकाचे गुण दिसतात. त्यांची वाणीही चांगली आहे. माणसांना आपलेसे करण्याचे विलक्षण कसब त्यांच्यात आहे.

यावेळी अभय काळुंके, बालाजी ढोबळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक कृष्णा सोनवणे यांनी तर सूत्रसंचालन लंका भवर यांनी केले. दिवाळी अंकाचे संपादक अजय देसाई हे सध्या छत्रपती संभाजीनगर येथे उपचार घेत आहेत. त्यांच्या अनुपस्थित हा कार्यक्रम झाला हे विशेष. त्यांची अनुपस्थित सर्वांना प्रकर्षाने जाणवली. पुढील दिवाळी अंकाच्या प्रकाशनासाठी ते निश्चित आपल्यात असतील अशी भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली. अजय देसाई यांचे पुतणे विशाल देसाई, प्रिया देसाई यांची आवर्जून उपस्थिती होती. तर अमृता रोहिणकर, लक्ष्मी काळे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

कष्टकऱ्यांच्या आनंदात सहभागी होणे, हीच दिवाळीची गोडी : भास्कर आबा दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जालना महानगर च्या पदाधिकाऱ्यांनी (दि.०७) रोजी मौजे बठान बु. ता.जालना येथे ऊसतोड कामगारांसोबत पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्ताने परिसरातील कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा देत भेटवस्तू तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या गृहउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित कामगारांशी संवाद साधला. समाजातील कष्टकरी आणि श्रमिक घटक हा आपल्या सामाजिक व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, अशी भावना यावेळी व्यक्त केली.

यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की कष्टावर अनेकांचे जीवनमान अवलंबून आहे. दिवाळी हा आनंद, आपुलकी आणि माणुसकी जपण्याचा सण आहे. कुटुंबापासून दूर राहून कष्ट करणाऱ्या या कामगारांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेता यावा, त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने भारतीय जनता पार्टी च्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात पालावरची दिवाळी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात व गरजूंच्या मदतीसाठी तत्पर राहणे हेच आपल्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे असेही त्यांनी सांगितले.

या प्रसंगी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदरगे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर, गटनेते महेश निकम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, सरपंच ज्ञानेश्वर देवडे, दत्तू नाना बागल, नानासाहेब देवडे, बळीराम शिंदे, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, राजाराम जाधव, गजानन खरात, विष्णू डोंगरे, कृष्णा गायके, शिवाजी गवारे, मदन गवारे, डॉ. राहुल मोरे, नागेश अंभोरे, दिगांबर गोल्डे, कुंडलिक जिजा देवडे, दिगंबर गोल्डे, उद्धव ढवळे, विष्णू ढगे, सागर वाहूळकर, सुधाकर शिंदेगणेश बागल, कडूबा जिजा देवडे, विठ्ठल बागल, सचिन बागल, सिद्धेश्वर देवडे, विनोद बागल, गजेंद्र बागल, गणेश देवडे, विश्वंभर देवडे, वैभव देवडे, प्रशांत उबाळे, परमेश्वर देवडे, चैतन्य देवडे, राजू देवडे, रामनाथ देवडे, नवनाथ सिरसाठ, भाऊसाहेब गोल्डे, रवी जगधने, बाबुराव बागल, सुभाष बागल यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवरायांच्या पुतळ्याजवळ २५ फुटी भगव्या शिवध्वजाचे रोहण

जालना । प्रतिनिधी

जगदंब प्रतिष्ठानच्यावतीने जालना येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात २५ फूट उंचीचा भव्य भगवा ध्वज उभारून ऐतिहासिक 'शिवध्वज महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. ज्याप्रमाणे दीपोत्सव साजरा केला जातो, त्याच धर्तीवर शहरात पहिल्यांदाच अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाजवळ २५ फुटी भगव्या शिवध्वजाचे रोहण करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

शनिवार, दि.७ रोजी दुपारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि शिवरायांचा जयघोष करत मान्यवरांच्या हस्ते विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्यात उपमहापौर राजेश राऊत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा ध्वज हा केवळ एक ध्वज नसून तो स्वाभिमान, रयतेचे राज्य आणि न्यायाचे प्रतीक आहे. ज्याप्रमाणे आपण विविध उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करतो, त्याचप्रमाणे शिवरायांच्या



स्मारकाजवळ हा २५ फुटी शिवध्वज सदैव फडकत राहून तरुणांना राष्ट्रभक्ती व शिवविचारांची प्रेरणा देत राहील. जगदंब प्रतिष्ठानने घेतलेला हा पुढाकार अत्यंत कौतुकास्पद आहे.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख म्हणाले की, छत्रपती शिवरायांचे विचार घराघरांत आणि मनामनांत पोहोचवणे काळाची गरज आहे. शिवस्मारकाजवळ अशा भव्य शिवध्वजाची स्थापना होणे ही संपूर्ण जालनेकरांसाठी अभिमानाची बाब असून प्रतिष्ठानचा हा उपक्रम समाजप्रबोधन व ऐक्याला बळ देणारा आहे. यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र राऊत यांनी या ऐतिहासिक उपक्रमाचे कौतुक केले आणि शिवकार्यासाठी तरुणांनी नेहमी संघटित होऊन पुढे यावे, असे आवाहन केले. संजय देठे यांनीही मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यास सहनिबंधक संजय देठे, काँग्रेस सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, जिल्हा विशेष शाखेचे पीएसआय सय्यद शौकत, गणेश शिंदे, शुभम कैलासराव राजगुरे, सार्थक पवार, योगेश सोळुंके, अर्जुन गायकवाड, महेश पाटील भुतेकर, मंदार पवार, रोहन खैरे, कल्हासिंग कलानी, शेख मुस्ताक आदींची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, न्यायालयीन कामकाज असल्याने सदर बाजार पोलीस ठाण्याचे पीएसआय सचिन सानप प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत; मात्र त्यांनी दूरध्वनीवरून या उपक्रमास व जगदंब प्रतिष्ठानला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन जगदंब प्रतिष्ठानचे शंभू पाटील व सहकाऱ्यांनी केले. यावेळी परिसरातील शिवप्रेमी नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जालना माहेश्वरी समाजातर्फे आयोजित दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहा : राठी

जालना । प्रतिनिधी

संपूर्ण जालना जिल्हा त्याच बरोबर जालना तालुका आणि शहरात सतत माहेश्वरी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवल्या जातात विजय गोपीकिशन राठी हे स्वाध्याय परिवाराच्या माध्यमातून त्यांची जिल्ह्यामध्ये चांगली ओळख आहे माहेश्वरी सामाजिक संघटनेच्या माध्यमातून सुद्धा रक्तदान शिबिर आरोग्य शिबिर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा स्वरूपाचे सामाजिक उपक्रम माहेश्वरी संघटनेच्या माध्यमातून राबवत आले आहे. नुकताच त्यांनी जालना माहेश्वरी समाजातर्फे दीपावली स्नेह मिलन कार्यक्रम अन्नकोट आणि गुणवंत विद्यार्थी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव सोहळा आयोजित केला आहे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान त्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

माहेश्वरी समाजाच्या संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण माहेश्वरी मारवाडी समाजाला उद्योग सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात पुढे नेण्याचे दृष्टिकोनातून सतत सामाजिक उपक्रम राबवले जात आहे. राठी प्रिटी प्रेसचे मालक विजय राठी हे समाजातील गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी नेहमी धडपड आणि तळमळ असते तसेच महेश मंत्र या साप्ताहिकाच्या माध्यमातून समाज संघटन करण्याची समाजाला मार्गदर्शन आणि दिशा देण्याची भूमिका सामाजिक दायित्व या भावनेतून दरवर्षी सामाजिक उपक्रम घेत आले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माहेश्वरी




समाजाच्या वतीने दीपावली दीपावली स्नेह मिलन गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माहेश्वरी समाज संघटनेचे अध्यक्ष विजय राठी यांनी केले आहे.

जालना माहेश्वरी समाजातर्फे बुधवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता मंठा रोडवरील महेश भवन येथे गुणवंत विद्यार्थी, विविध पदावर नियुक्त पदाधिकाऱ्यांचा गौरव सोहळा आयोजित केला आहे. तर सायंकाळी ६ वाजता ज्वाला लॉन्समध्ये दीपावली स्नेह मिलन व अन्नकूट सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, समाज बांधवांनी दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी व सचिव उमेश बजाज यांनी केले आहे.

समाजातील गुणवंत विद्यार्थी, विविध पदाधिकारी तसेच विशेष उपलब्धी मिळवणाऱ्या बांधवांचा गौरव करण्यासाठी प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही गुण गौरव-सत्कार समारंभ महेश भवन, जालना येथे होईल. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मेटासेल्स इस्पातचे व्यवस्थापकीय संचालक द्वारकाप्रसाद सोनी आणि छत्रपती संभाजीनगरचे पोलीस उपनिरीक्षक मयूर चरखा हे ही उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात दहावी व बारावीत ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे, एमएचटी-सीईटी, जेईई व नीटमध्ये ९० पर्सेंटाईल मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच सीए, सीएस, सीएमए, एमबीबीएस, एमडी, बीएएमएस, बीएचएमएस, बीडीएस, एमडीएस यांसारख्या अभ्यासक्रमांत यश मिळवलेले, पीजीमध्ये बी प्लस श्रेणी प्राप्त केलेले, तसेच इंजिनिअर, एलएलबी, पीएच.डी., एमपीएससी व यूपीएससी उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा गौरव करण्यात येणार आहे. विशेष उपलब्धीअंतर्गत बँक व पतसंस्थांचे अध्यक्ष व संचालक, क्लब व सामाजिक संस्थांचे अध्यक्ष तसेच विभागीय, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.


यावेळी वंदे मातरम् च्या थीम वर आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी ५-३० वाजता ज्वाला लॉन्स येथे आयोजित दीपावली स्नेह मिलन व अन्नकूट सोहळ्याला प्रमुख अतिथी व वक्त्या म्हणून हैदराबाद येथील डॉ. सौ. अनुराधा जाजू ह्या उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. दोन्ही कार्यक्रमांना समाजबांधवांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन रामेश्वर बजाज, श्रीनिवास भक्कड, ओमप्रकाश मंत्री, विजय बी. राठी, संजय दाड, रामनिवास मानधानी, कांतीलाल राठी, सत्यनारायण सारडा, कैलास लोया, दामोदर बजाज तसेच जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज यानी केले आहे.






















जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).